Government of Karnataka

माय मराठी

इयत्ता सहावी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

6

Sixth Standard

Marathi First Language

Part - 2

Karnataka Text Book Society (R.)
6th Cross, Malleshwaram
Bangalore - 560 003.


दूसरे सत्र

अनुक्रमणिका

अ.नं.	पाठाचे/कवितेचे नाव	लेखक/कवी	मूल्ये	पृ.क्र.
11	माझी शाळा *	दयाराम गिलाणकर	कृतज्ञता, स्वयंशिस्त परस्पर सहकार्यभावना	1
12	डोंगरातली शाळा	डॉ. अनिल अवचट	साक्षरता प्रसार निसर्गप्रेम, अहिंसा	4
13	जन्म झाला शुन्याचा		वैज्ञानिक मनोभाव, विश्वास	10
14	सूर्योदय *	शांता शेळके	निसर्गप्रेम, स्वयंशिस्त, सौजन्य	16
15	कर्नाटक-प्रेक्षणीय स्थळे	-	राष्ट्रीय भावैक्यता, सौजन्य	20
16	संवादिनी	श्रीधर कुलकर्णी	कृतज्ञता	29
17	एक होती अवकाश कन्या	-	साहस, विश्वास, नेतृत्व	37
18	माझ्या लहानपणीची बाग	माधवानुज	कर्तव्यनिष्ठा इतरांबद्दल काळजी	45
19	चुकलेलं पांखरू	-	सत्य प्रियता, स्वामी निष्ठा	50
20	चोर रंगेहात पकडला गेला	योगेश जोगी	स्वामी निष्ठा कृतज्ञता	63
21	आणि काय आश्चर्य	पुरूषोत्तम धाकस	प्रसंगावधान, तारतम्य	67
22	अभंग *	संत नामदेव	भक्ती, प्रामाणिकपणा, आदर्श विचार	75
	* शब्द संग्रह	-	-	79
* अशी खूण केलेल्या कविता पाठांतरासाठी आहेत.				

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

11. माझी शाळा



ओवाळीते जीव, जशी माझी माय
दुधावर साय, शाळा माझी ।

सुंदर घडतो, मातीचा हा गोळा
लावितसे लळा, शाळा माझी।

रूजविते शिस्त, पुरविते लाड
आनंदाचे झाड, शाळा माझी।

सुविचार धन, यशाच मैदान
संस्काराची खाण, शाळा माझी।

क्रीडेचा उत्सव, छंदांचं आगर
कलेंचे माहेर, शाळा माझी।

शब्दांची हिरवळ, भावनाचं रान
निसर्गाच लेणं, शाळा माझी।

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

सद्‌गुणी शिष्य, गुरु सदाचारी
कसोटीची फेरी, शाळा माझी ।

जंगी मित्रमेळा, विद्येचे पुजारी
पंढरीची वारी, शाळा माझी।

अंधारल्या मनी, पेटविते वात
ज्ञानाची ही ज्योत, शाळा माझी।

कवी - दयाराम गिलाणकर

नवीन शब्दार्थ :

रुजविणे - पेरणे
धन - पैसा, संपत्ती
उत्सव - समारंभ
लेणं - अलंकार
माय - आई, माता, जननी
कसोटी - परीक्षा

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. दुधावरची साय अशी उपमा कोणाला दिली आहे?
2. झाड कशाचे आहे?
3. शिष्य कसा असावा?
4. ज्योत कशाची पेटवावी?
5. कलेचं माहेर कोणते ?

आ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. गुरू हे _____ असतात.
2. शाळेमध्ये जंगी _____ असतो.
3. आई मुलांच्यावरती जीव _____
4. दरवर्षी आम्ही क्रीडा _____ साजरा करतो.
5. मातीचा गोळा _____ घडतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे कवितेतील शब्द शोधून लिही.

नमूना : आनंदाचे – झाड

1. यशाचं _____
2. संस्काराची _____
3. कलेच _____
4. छंदांचं _____
5. शब्दांची _____
6. भावनाचं _____
7. निसर्गाच _____
8. विद्येचे _____
9. पंढरीची _____
10. कसोटीची _____

ई. खालील वाक् प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. लळा लावणे. _____
2. लाड पुरविणे. _____
3. शिस्त रूजविणे. _____
4. जीव ओवाळून टाकणे. _____

उ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. तू शाळेत कोणकोणते खेळ खेळतोस ? '
2. तुळा शाळेत काय काय शिकवितात ?

*** उपक्रम**

1. तुझ्या शाळेबद्दळ तुला काय वाटते ते 10 ते 15 ओळीत लिही.
2. तुझ्या शाळेचे चित्र काढ व रंगव.

*** हे असेच लिही-**

हुशार, शिबिर, क्रिया, उल्हास, क्रीडा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

12. डोंगरातली शाळा

J2W8L4



ते एक जंगलातलं गांव, वाडीच म्हणायची, आजूबाजूला डोंगर, एका बाजूला दऱ्या, पुढे कोकणच, मध्येच जराशी सपाट जागा. सगळा परिसर दाट झाडीने मढलेला, बांडगुळ महावृक्षापासून ते फांद्याफांद्यावर लोंबणाऱ्या मॉस वनस्पतीपर्यंत. वाडीतून मूलं शाळेसाठी खालच्या गावात उतरून जात असत. काही बाजार करायचा तरी खालचं गावच. एका अवघड पायवाटेने जावं-यावं लागे, पण सगळ्यांच्या सवयीचं झालं होतं हे.


गावात पवना नावाची तरूण मुलगी रहात होती. ती शहरात जाऊन शिकली-सवरली. तिचं लग्न झालं. शहरातील कुणाशीतरी, पण काय? ..... तो दारूडा निघाला. हिचा खूप म्हणजे खूपच छळ झाला. शेवटी ही निघून आली, तिच्या बाबांच्या घरी. कधी तरी ऐकलं की नवरा मेलासुध्दा. आई-वडील, भाऊ-भावजया तिच्याशी प्रेमाने वागत. ती भावांच्या मुलांना शिकवत असे. खालच्या गावातल्या शाळेतही ती मूलं चमकत असत. मग गावातली इतर मुलंही शिकवणीला यायला लागली.

गावचा एक माणूस शंभू-मुंबईला जाऊन स्थायिक झालेला. तो फळांचा व्यापार करून फार श्रीमंत झाला होता. पवनाची शिकवण बघून त्याच्या मनात आलं, गावाला शाळा बांधून शाळेला वडिलांचं नांव देऊन टाकू. एक दिवस त्याने गावकऱ्यापुढे शाळेचा विचार ठेवला. गावकरी म्हणाले खाली शाळा आहे. मग आणखी कशाला? तरी त्याने प्रयत्न चालूच ठेवला, शेवटी गावानं होकार दिला. 'शाळा बांधू ती सिमीट कांक्रीटची, अशी त्यानं घोषणा केली. गावात सिमेंटच एकही घर नव्हतं, पण सिमेंट विटा आणणार कशा? ट्रकमधूनच ना? मग रस्ता? त्यान झाडं तोडायला मजूर लावले.

गावात हाहाकार माजला. झाड तोडणं हा फार मोठा गुन्हा. शंभून पहिल्या झाडावर घाव घातला. ते वडाचं, म्हणजे देवाचं झाड. अमक्या झाडाखाली

© IOKTD NOT TO BE REPUBLISHED

मुंज्या, तमक्या झाडाखाली जेतोबा, अस गाव मानीत होतं. झाडे तोडणाऱ्या टोळीला गावकऱ्यांनी परत पाठवलं. त्यान गावाचं नावच टाकलं. त्याबरोबर शाळेचं ही नांव टाकलं. पण पोरांच्या डोक्यात सतत होतं शाळा पाहिजे. पण सिमीट कांक्रीटची नको. पवनाताईशी हे बोलले. पवनाला खूप आनंद झाला. कारण पोरं म्हणाली शाळा बांधायची, अन् तू त्यात मास्तरीण.



कशाची बांधायची? चिऱ्याची? म्हणजे जांभ्या दगडाची? छे छे! त्या खाणी असतात. चिरे काढणारे लोक असतात. त्यासाठी पैसे कुठून आणायचे ? पवनाताई म्हणाली. आसपास नजर टाका, उत्तर सापडेल. बाळानो गरज ही शोधाची जननी आहे. पवनाताईंने तुरे आलेल्या झाडाकडे बोट दाखवलं. अरे बांबू? वा वा! उत्तर सापडलंच की, पण ते झाडच की ते कस तोडायचं.... कसं तोडायचं? ताईन समजावलं. बांबू म्हणजे गवत. गवत परत येतं. तसा बांबू परत येईल. वीस वर्षानी बांबूच बेट. मस्त बिया पडतात. परत बांबू येतोच. पण बांबूची कशी शाळा होईल?

मग त्यांनी मिळून नकाशा तयार केला. लांबचलांब शाळा बांधायची, पण भिंती कशाच्या? कुणाचं तरी लक्ष गेलं. आपण नारळाच्या झावळ्या मातीच्या भिंतीपुढं लावतो पावसाची झड लागू नये म्हणून, त्याचा उपयोग करू भिंती उभारण्यासाठी. बांबूला कीड वगैरे लागू नये यासाठी त्यांनी आनंद कर्वेच्या आरती संस्थेकडून सर्वशास्त्रशुद्ध बांबूविषयी माहिती मिळविली. ती गावकऱ्यांना उपयोगी पडली.

मुलामुलींना झाप विणायचं काम माहित होतच. पानाची कडेची टोकं एकाआड एक बांधायची, बांबू रोवले गेले. आता पोराबरोबर आया आल्या आणि बापही आले. सर्वांनी मिळून सांगाडा तयार केला. झापानाही बांबूच्या कामट्यांनी सांधून त्यांच्या भिंती तयार, वर पेंढा टाकून छप्पर तयार. आणि शाळा सुरू झाली. पण ती कांही वेळ आत आणि बराच वेळ बाहेर.

झाडाखाली शिकता शिकता झाडालाही गोडी लागली. झाडावर चिमण्या, कावळे, बुलबुल अशा पक्ष्यांचे वर्ग भरू लागले. आसपासच्या डोंगरीगावामधली मुलं

@AESS NOT TO BE REPUBLISHED

आता त्याच शाळेत शिकायला येऊ लागली. आणि एके दिवशी एक माणूस डोंगर चढून गावात आला. तो होता रघू. पवनाचा नवरा. पवना त्याच्याकडे बघतच राहिली. आता तो स्वच्छ दिसत होता. चेहऱ्यावर चमक होती. तो म्हणाला पवने मला माफ कर. मी गेली पाच वर्षे व्यसनमुक्ती केंद्रात होतो. तिथून हा बदल झाला. सगळं गाव भोवती जमा झालं. मुलांना भिती वाटली. आता हा आपल्या पवनाताईला नेणार.

पण पवना म्हणाली. मी आता या शाळेला, माझ्या मुलांना सोडणार नाही. रघू म्हणाला. ठीक आहे मीच इथं राहीलो तर !

पवनाचे वडील ओरडले. वा ! जावईबापू, घर तुमचच आहे.

रघू खूप शिकलेला. तो ही आता शिकवितो. आता शाळेतल्या मुलांना ताई बरोबर आणखी प्रेम करणारा मिळालाय, त्यांचा रघूदादा. एकदा तर शंभू गावी आला, आणि हे पाहून म्हणाला. ''त्या शिमीटापेक्षा हे बेस्ट हाय।''

अनिल अवचट

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दांचे अर्थ

वाडी – 10 ते 15 घरे असणारी वसती
मढ्लेला – आच्छादलेला
महावृक्ष – मोठे झाड
चमकणे – प्रकाशणे
शिकवण – शिक्षण
घोषणा – जाहीर करणे
सतत – कायम, नेहमी
आसपास – भोवताली
झापा – कामठ्या, झावळ्या
पेंढा – ज्वारीच्या कांज्या किंवा – धाट
छप्पर – घरावरचे आच्छादन
चिरा – घडीव दगड

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. गाव कोठे होतं?
2. मुले शाळेला कशी जात असत?
3. पवना कोण होती?
4. शाळा बांधायची असे कोणी ठरविले?
5. शाळा कशाची बांधली?

आ. पाठाच्या आधारे रिकाम्या जागा भर.

1. शाळा बांधू ती _____ अशी त्याने घोषणा केली.
2. वडाचे झाड म्हणजे _____ चे झाड आहे.
3. पोरांच्या डोक्यात सतत होत _____
4. गरज ही _____ जननी आहे.
5. झाडाखाली शिकता शिकता _____ गोडी लागली.

इ. खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिही.

1. गावची परिस्थिती कशी होती?
2. गावात शाळा बांधायचे का ठरले?
3. शाळा बांधण्यासाठी कोणत्या अडचणी आल्या?
4. शाळा बांधण्यासाठी कशाचा वापर केला?
5. शाळा पाहून शंभूला काय वाटले?

ई. समान अर्थी शब्द लिही.

अवघड - रस्ता -

मजूर - बांबू -

सांगाडा - झाड -

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

उ. विरुद्ध अर्थी शब्द लिही.

श्रीमंत × नेणार ×

होकार × साक्षर ×

ऊ. कोणी, कोणास, व केव्हा म्हणाले ते सांग व लिही.

1. ''शाळा बांधू ती सिमिट कांक्रीटची''
2. ''शाळा बांधायची अन् तू त्यात मास्तरीण''
3. ''पवने मला माफ कर''
4. ''त्या शिमिटापेक्षा हो बेस्ट हाय'!

*** 'गरज ही शोधाची जननी आहे?' याचा अर्थ शिक्षकाकडून समजून घे.**

1. तुझी शाळा कशी आहे. हे तुझ्या शब्दात वर्णन कर व शिक्षकाना दाखव.
2. 'शिक्षणाचे महत्व' तुझ्या शब्दात वर्णन कर.
3. तंबू शाळा म्हणजे काय तुझ्या शिक्षकाना विचार.
4. तुझ्या गावात साक्षर भारत वर्ग कोणासाठी चालवतात हे समजून घे.

उपक्रम : तू शेजारच्या निरक्षर व्यक्तीला शिकवून आनंद मिळव.

*** हे असेच लिही-**

डाहळी, उज्वल, दूर्वा, भोवताली, सामग्री.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

वचन विचार

नामाच्या रूपावरून जेव्हा एका वस्तूचा बोध होतो तेव्हा त्याचे **'एकवचन'** असते. जसे-मुलगा, पेटी, इमारत, आंबा.

नामाच्या रूपावरुन जेव्हा एकापेक्षा अधिक संख्येचा बोध होतो तेव्हा त्याचे **'अनेक वचन'** असते. जसे मुलगे, पेट्या, इमारती, आंबे अनेक वचनाला कोणी 'बहुवचन' असेही म्हणतात.

नामाची अनेक वचनाची रूपे बनविताना काही नामाना प्रत्यय लागतात तर काही ची रूपे एकवचना सारखीच राहतात.

* आकारांत पुलिंगी नामाचे अनेकवचन एकारांत होते.
  उदा: कुत्रा-कुत्रे, ससा-ससे, रस्ता-रस्ते
* आकारांताशिवाय इतर सर्व पुलिंगी नामाची रूपे दोन्ही वचनात सारखीच असतात.
  उदा: देव-देव, उंदीर-उंदीर, कवी-कवी, लाडू-लाडू
* अ -कारांत स्त्रिलिंग नामाचे अनेक वचन केव्हा आ-कारांत तर केव्हा ई-कारांत होते.

उदा :	वेळ-वेळा	तारीख-तारखा	सून-सुना
	वीट-विटा	विहीर-विहिरी	
	चूक-चुका	म्हैस-म्हशी	

* आकारांत स्त्रिलिंगी तत्सम नामाचे अनेकवचन एकवचनासारखेच असते.
  दिशा-दिशा, आशा-आशा.
* ऊ-कारांत स्त्रिलिंगी नामाचे अनेक वचन वा-कारांत होते.
  उदा: सासू-सासवा, जाऊ-जावा
* अ - कारांत नपुसकलिंगी नामाचे अनेकवचन ए-कारांत होते.
  उदा: घर-घरे, फूल-फुले
* ए-कारांत नपुसकलिंगी नामाचे अनेक वचन ई-कारांत होते.
  उदा. रताळे-रताळी, खेडे-खेडी

केव्हा केव्हा व्यक्ती एक असूनही त्याबद्दल आदर दाखविण्यासाठी मराठीत आपण अनेकवचनी प्रयोग करतो.


जसे 1. बाबा, उद्या मुंबईस जातील.

2. मुख्यमंत्री शाळेस भेट देणार आहेत.
   अशावेळी त्यास आदरार्थी अनेकवचन म्हणतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

13. जन्म झाला शून्याचा!

एकदा जगातील गणित तज्ञांची एक सभा भारतीय विद्यापीठात भरला होता. सभेला ग्रीक, रोमन, अरब, ज्यू. वगैरे बरीच गणित तज्ञ मंडळी हजर होती. सभेचे अध्यक्षपद भारतीय गणिती तज्ञ ब्रह्मगुप्ताकडे होते. सभेचा विषय होता, 'संख्याशास्त्राचा अभ्यास सोपा करण्याच्या पध्दतीचा शोध घेणे''. सर्व तज्ञ मंडळी या विषयावर बराच अभ्यास करून आली होती.



सभेमध्ये बरीच मोठी चर्चा झाली. उलट-सुलट विचार मांडले गेले. मात्र गणितात वारेमाप निर्माण झालेल्या चिन्हांची काटछाट होईल, गुंतागुंत कमी होईल, आकडे सहज मांडले जातील, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सोपा होईल, असा मार्ग, असा विचार कोणीही सुचवित नव्हते. उलट गणितात आणखी काही नवी चिन्हे समाविष्ट होतात की काय अशी भिती निर्माण झाली होती.

अगोदरच दहा, वीस, तीस, पन्नास वगैरे दहापटीतील आकडे मांडण्यासाठी, शंभर पटीतील आकडे मांडण्यासाठी वेगवेगळी चिन्हे होती. रोमन पद्धतीत दहा हजार

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

मांडताना 'C' हे चिन्ह शंभर वेळा लिहावे लागे. वीस मांडताना दहाचे चिन्ह दोनदा मांडावे लागत असे. त्यामुळे गणितात पुन्हा नवीन चिन्हे येणार नाहीत याची काळजी शास्त्रज्ञ घेत होते. चर्चा वाढत होती, परंतु एकमत होत नव्हते. सर्वच त्रस्त झाले होते. सर्वांच्या भाषणानंतर हळूच ब्रम्हगुप्ताने अतिशय नम्रपणाने आपला ग्रंथ पुढे केला. ते म्हणाले ''गणितातील गुंतागुंत कमी करण्यासाठी मी एक नवीन मित्र गणितात आणला आहे. हा घ्या शून्य ''! सर्वांचे डोळे विस्फारले, सर्वजण कान देऊन ऐकू लागले. समोरच्या फलकावर भला मोठा शून्य सर्वांच्या सेवेसाठी हजर झाला. ब्रम्हगुप्त पुढे म्हणाले, 'मित्र हो, एकावर शून्य द्या, झाले दहा. दोनावर शून्य द्या, झाले वीस. कोणत्याही आकड्याची किंमत हा माझा मित्र दहा पटीनं वाढवील.

कोणत्याही आकडयावर दोन शून्य द्या, माझा हा मित्र त्याची किंमत शंभर पटीने वाढवील. तीन शून्य द्या, सहस्त्रपटीन वाढवील. कोणत्याही आकड्यामागे टिंब ठेवून नंतर शून्य ठेवा, माझा हा मित्र त्या आकड्याची किंमत दहापटीन कमी करील. याच पद्धतीन आकडयाची किंमत शंभर पटीन, सहस्त्र पटीन कमी कमी होत जाईल.

तुम्ही माझ्या या शून्याला कोणत्याही आकड्यात मिळवा अगर कोणत्याही आकड्यातून वजा करा तुमचे आकडे आहेत तसेच राहतील. मात्र माझ्या शून्याने कितीही मोठ्यात मोठ्या संखेला गुणा किंवा भागा, गणिताचं उत्तर शून्य येईल. असा हा महापराक्रमी शून्य स्वतः मात्र किंमत शून्य आहे. त्याला स्वतःला काहीही किंमत नाही. परंतु तो गणितात शिरला तर गणितात फार मोठी क्रांती घडेल. गणितातील गुंतागुंत कमी होईल. आपल्या डोक्यावरचा भार हलका होईल. एवढे सर्व पटवून दिल्यावर सर्व तज्ञांनी ब्रम्हगुप्ताचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले. सर्वानी शून्याचे स्वागत केले.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दांचे अर्थ

ज्यू - एक जमात

वारेमाप - घसघशीत खूप, भरपूर

काटछाट - कमी करणे

त्रस्त - त्रासलेला

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. गणित तज्ञांची सभा कोठे भरली होती?
2. सभेचे अध्यक्षपद कोणाकडे होते?
3. नवीन मित्र गणितात का आणला?
4. महापराक्रमी कोणाला म्हटले आहे?
5. ब्रह्मगुप्ताचे अभिनंदन कोणी केले?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. सभेमध्ये कोणत्या विषयावर चर्चा झाली?
2. रोमन लिपीमध्ये दहा हजार ही संख्या कशी लिहावी लागे?
3. शून्याला महापराक्रमी असे का म्हटले आहे?
4. सभेला कोणकोणत्या देशातील तज्ञ मंडळी हजर होती?

इ. रिकाम्या जागा भर.

1. जगातील _____ ची सभा भरली होती.
2. ब्रह्मगुप्ताने नम्रपणाने आपला _____ पुढे केला.
3. नवीन मित्र _____ ला म्हटले आहे.
4. गणितात शून्यामुळे फार मोठी _____ घडली.
5. सर्वांनी _____ स्वागत केले.

ई. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग कर.

1. विस्फारणे
2. नम्रपणा
3. स्वागत
4. अभिनंदन

उ. शून्या विषयी सात ते आठ ओळी माहिती लिही.

@RSCERT NOT TO BE REPUBLISHED

ऊ. चूक की बरोबर ते लिही.

1. शून्याला स्वत:ला अशी काही किंमत नाही.
2. अंकाच्या समोर (पुढे) शून्य लिहिल्यास शून्याला किंमत येते.
3. अंकाच्या डाव्या बाजूला टिंब देऊन शून्य लिहिल्यास किंमत दहापटीने कमी होते.
4. अंकाच्या उजव्या बाजूला शून्य लिहिल्यास अंकाची किंमत दहापटीने वाढते.

ए. शिक्षकांच्या मदतीने आणखी काही गणित तज्ञांची नावे माहिती करून घे.

ऐ. खालील वाक्प्रचारांचा अर्थ शिक्षक/पालकांच्या कडून समजून घेऊन लिही.

1. काटछाट करणे.
2. गुंतागुंत कमी करणे.
3. उलट सुलट विचार करणे.
4. महापराक्रम गाजविणे.
5. डोक्यावरचा भार हलका होणे.

ओ. पुढील शब्द नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :भाजी - भाजी भाकरी

1. काट
2. वारे
3. गुंता
4. उलट

उपक्रम : काही वैदिक गणितज्ञांची नावे व चित्रे जमवून संग्रह कर.

हे असेच लिही : **गणिततज्ञ, रुजुवात, ऊहापोह, सुज्ञ.**

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

लिंग विचार

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे. की स्त्री जातीची आहे, की दोन्हीपैकी कोणत्याच जातीची नाही, असे ज्यावरुन कळते त्याला त्याचे **'लिंग'** असे म्हणतात.

मराठीत तीन लिंगे मानतात.

1. पुलिंग 2 स्त्रीलिंग 3. नपुसकलिंग

मराठीत लिंग ओळखण्याची पद्धत कोणती ?

प्राणीमात्रातील पुरुष किंवा नर यांचा उल्लेख आपण 'तो' या शब्दाने करतो व स्त्रीकिंवा मादी यांचा उल्लेख ती या शब्दाने करतो. जसे तो बाप, ती आई तो घोडा, ती घोडी.

सजीव प्राण्यातील एखादा नर आहे कि मादी हे निश्चित सांगता येत नसेल तर त्याला 'नपुसकलिंगी' मानून त्याचा उल्लेख ते या शब्दाने करतो.

जसे ते-कुत्रे, ते-वासरू, ते-पाखरु

निर्जीव वस्तुच्या बाबतीत काही काल्पनिक पुरुषत्व व स्त्रीत्व लादून त्या वस्तूच्या मागे तो-ती-ते हे शब्द वापरून आपण त्यांचे लिंग ठरवितो.

पुलिंग	स्त्रीलिंग	नपुसकलिंग
तो-वाडा	ती-इमारत	ते-घर
तो-भात	ती-भाकरी	ते-वरण
तो-दिवा	ती-पणती	ते-तेल

* आ-कारांत पुलिंगी प्राणीवाचक नामाचे स्त्रीलिंगी रूप ई - कारांत व नपुसकलिंगी रूप एकारांत होते

जसे- मुलगा, मुलगी, मुलगे,

घोडा, घोडी, घोडे

NOT TO BE REPUBLISHED @KTDS

* काही प्राणीवाचक पुलिंगी शब्दात 'ईण' हा प्रत्यय लावून त्याची स्त्रीलिंगी रूपे होतात. उदा : माळी-माळीण, पाटील-पाटलीण

* काही प्राणीवाचक अ-कारांत पुलिंगी नामाची स्त्रीलिंगी रूपे ई - कारांत होतात. जसे : बेडूक-बेडकी, गोप-गोपी

* काही आकारांत पुलिंगी पदार्थवाचक नामाना 'ई' प्रत्यय लागून त्याची लघूत्व दर्शक स्त्रीलिंगी रूपे होतात.
उदा : लोटा-लोटी, गाडा-गाडी

* संस्कृतातून मराठीत आलेल्या नामाची स्त्रीलिंगी रूपे 'ई' प्रत्यय लागून होतात.
उदा : युवा-युवती, श्रीमान - श्रीमती, भगवान - भगवती

* काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्र रीतीने होतात.


बाप-आई	वर-वधू	राजा-राणी
रेडा-म्हैस	मोर-लांडोर	बोकड-शेळी

* मराठीत काही शब्द निरनिराळ्या लिंगातही आढळतात.
उदा : बाग (पु. स्त्री) ढेकर (पु.स्त्री)
वेळ (पु. स्त्री) पोर (पु.स्त्री)

* परभाषेतून आलेल्या शब्दाचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून सामान्यता ठरवितात.
उदा : बूट (जोडा) पु. पेन्सिल (लेखणी) स्त्री. क्लास (वर्ग) पु.
बूक (पुस्तक) न. कंपनी (मंडळी) स्त्री ट्रंक (पेटी) स्त्री.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

14. सूर्योदय



बघ आई आकाशात सूर्य हा आला
पांघरून अंगावर भरजरी शेला
निळ्या त्याच्या महालाला खांब सोनेरी
मोतीयाच्या लावियेल्या आत झालरी
केशराचे घातले हे सडे भूवरी
त्यावरूनी येई त्याची डौलाने स्वारी
डोंगराच्या आडून हा डोकावी हळू
आणि फुले गुलाबाची लागे उधळू
नभातून सोनीयाच्या ओतीतो राशी
गुदगुल्या करीत तो खेळे फुलाशी
पांखराच्या संगे याची सोबत छान
गाती बघ कशी याला गोड गायन
मंद वारा जागवितो साऱ्या जगाला
म्हणतसे 'उठा उठा मित्र हा आला'.

- शांता शेळके

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ:

सूर्योदय - सूर्य उगवणे
पांघरून - झाकून घेणे
भूवरी - जमिनीवर
आडून - लपून
डोकावणे - हळूच पहाणे
डौलाने - दिमाखात, तोऱ्यात
नभ - आकाश
संगे - सोबत, बरोबर
मंद - हळूवार, सूस्त
वारा - पवन, वायू
राशी - ढीग
शेला - पांघरण्याचे उंची वस्त्र
झालर - शोभिवंत रंगीत चुणीदार कापडाची पट्टी
मित्र - सूर्य

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. आकाशात कोण आलेला आहे?
2. त्याच्या महालाचे वर्णन कसे केले आहे?
3. भूवरी काय घातले आहे?
4. नभातून कोणत्या राशी ओतीत आहे?
5. सोबत कोणा बरोबर झाली आहे?
6. साऱ्या जगाला कोण जागवितो?
7. उठा उठा असे कवयित्री का म्हणत आहे?

आ. कवितेच्या आधारे ओळी पूर्ण कर.

1. निळ्या त्याच्या महालाला _____ सोनेरी.
2. _____ घातले सडे भूवरी.
3. _____ फुले उधळू लागतो.
4. फुलांशी _____ करीत खेळतो.
5. वारा _____ जागवितो.

इ. समानार्थी शब्द लिही.

1. आकाश _____
2. सूर्य _____
3. मित्र _____
4. पाखरे _____

ई. नमुन्या प्रमाणे लिही.

नमुना : फूल - फुलणे

खेळ -

नाच -

रंग -

उ. शब्द समुहात न जुळणारा शब्द ओळख व त्याच्या भोवती गोल कर.

सूर्योदय - प्रकाश, सूर्यकिरण, पक्ष्यांची किलबील, चंद्र

डोंगर - दरी, खोरे, नदी, पठारे

नभ - आकाश, गगन, ढग, झाडे

घर - आई, बाबा, फुलपांखरे, मुले

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऊ. यमक जुळणारे शब्द लिही.

जसे - आला - शेला

झालरी -

हळू -

राशी -

छान -

ए. खालील शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

डोकावणे -

संगे -

राशी -

मंद -

ऐ. खालील कवितेच्या ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.

1. निळ्या त्याच्या महालाला खांब सोनेरी
   मोतीयाच्या लावियेल्या आत झालरी.

2. नभातून सोनियाच्या ओतितो राशी
   गुदगुल्या करीत तो खेळे फुलांशी.

*** उपक्रम**

1. आईला सूर्य दाखवत असताना सुर्याचे कशा प्रकारे वर्णन केले आहे?
2. सूर्य उगवल्यावर दिसणाऱ्या दृष्याचे वर्णन तुझ्या शब्दात लिही?
3. कर्तव्यनिष्ठा याविषयी शिक्षकांकडून माहिती समजून घे.
4. सुर्यास्ताच्या देखाव्याचे चित्र काढ आणि रंगव.

*** हे असेच लिही.**

चातुर्मास, नेत्रदीपक, रोशणाई, लवकर

© KBS NOT TO BE REPUBLISHED

15. कर्नाटक - प्रेक्षणीय स्थळे

F8Y7E5



भारताच्या दख्खन पठाराच्या पश्चिमेस कर्नाटक राज्य वसलेले आहे. भारतीयां-बरोबरच परदेशी लोकांचे देखील हे आवडते पर्यटन स्थळ आहे. कर्नाटकाला स्वतःचा असा इतिहास आहे. काही विद्वानांच्या मते कर्नाटक हे नाव काळीसुपिक माती असणारा प्रदेश म्हणजे करीनाडू या वरून पडले असावे. सुंदर, रम्य प्रदेश म्हणजे करुनाड असे काही विद्वानांना वाटते. येथील राज्यभाषा कन्नड आहे. कन्नड बरोबरच मराठी, तामिळी, तेलगू, मल्याळी, उर्दू या भाषादेखील येथे बोलल्या जातात. वन, जल, प्राणी, खनिज संपत्ती येथे भरपूर आहे. तांबे, लोखंड बॉक्साईट, मँगनीज, सोने या खनिज संपत्तीने समृद्ध असणाऱ्या या भूमीस सुवर्णभूमी म्हणतात ते बरोबरच आहे. कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा, शरावती नद्यांचे खळाळते प्रवाह व प्रपात या भूमीस सुजलाम्-सुफलाम बनवितात. कर्नाटकाने अनेक कवी, लेखक, शास्त्रज्ञ, अभियंते, चित्रकार, नाटककार, अभिनेते दिले आहेत.

बेंगलूरु ही कर्नाटकाची राजधानी आहे. हे शहर आज विज्ञान नगरी व सिलिकॉन सिटी म्हणून ओळखले जाते. दूतर्फा वृक्षराजी असणारे येथील रस्ते स्वच्छ व सुंदर आहेत. चौका-चौकात कारंजे व उद्याने असणारे बेंगलूरु शहर 'बगिच्यांचे शहर' हे नाव सार्थ करते. येथील विश्वेश्वरय्या म्युझियम मध्ये विज्ञानाच्या प्रगती

© IBS NOT TO BE REPUBLISHED

विषयी तसेच निरनिराळ्या यंत्रांबद्दल व अवजारांबद्दल माहिती मिळते. लालबाग, इस्कॉन मंदिर, विधान सौधची भव्य इमारत, कब्बनपार्क, वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम असणाऱ्या भव्य वास्तू शहराच्या वैभवात भर टाकतात. रेशीम वस्त्रोद्योग व सुगंधी द्रव्यांची उत्पादन केंद्रेही येथे आहेत.

कर्नाटकात पूर्वीच्या म्हैसूरु राज्याची राजधानी म्हणून - ऐतिहासिक महत्व असणारे मैसूरु शहर आजही आपले वैभवशाली रूप टिकवून आहे. येथील देवालये, राजवाडे पाहताना आपण ऐतिहासिक काळात प्रवेश करतो. चर्च, प्राणी संग्रहालय, प्रमुख विद्याकेंद्रे, कुटिरोद्योगांची केंद्रे येथे आहेत. येथील वृंदावन गार्डन मानवी कलाविष्काराचा उत्तम नमुना आहे. येथून जवळच असणाऱ्या रंगनतिट्टू पक्षिधामामध्ये अनेक प्रकारचे पक्षी पहायला मिळतात. टिपू सुलतानचा राजवाडा हे उत्तम वास्तुशिल्प आहे. श्रीरंगपट्टण येथील रंगनाथाचे मंदिर प्राचीन शिल्पकलेचे उदाहरण आहे. येथील शेषशायी विष्णूची काळ्याभोर पाषाणातील मूर्ती पाहताना डोळ्याचे पारणे फिटते. चामुंडी टेकडी आणि त्यावरील भव्य नंदी आपल्याला आकर्षित करतो.

कर्नाटक म्हणजे पर्यटकांचे नंदनवनच! नैसर्गिक व मानवनिर्मित सौंदर्य स्थळे या प्रदेशात भरपूर आहेत. बंडीपूर, नागरहोळे, दांडेली, बनेरघट्टा ही अभयारण्ये हत्ती, गवे, लंगूर, वाघ यासाठी खास राखून ठेवलेली आहेत. कीटक व सर्पांच्या दुर्मिळ जाती, औषधी वनस्पती यानी येथील वनराई अधिकच समृद्ध बनली आहे. कूर्ग आणि चिक्कमंगळूर येथील निसर्ग सौंदर्य चित्रपटसृष्टीसही आकर्षित करते. चित्रपटांचे चित्रीकरण येथील चहाकॉफीच्या सुंदर मळ्यातून केले जाते. सुगंधी फुलांचे वृक्ष, वेलीसाठी कर्नाटकाचे हवामान फारच चांगले आहे. सोनचाफा, मोगरा, जाईजुई, चंदन यांची येथे उत्तम लागवड होते. कर्नाटकाचा राजवृक्ष चंदन आहे. सुगंधी द्रव्ये, पावडरी, अगरबत्ती आणि साबण यांचे उत्पादन येथे मोठ्या प्रमाणावर होते. वेलदोडे, मीरी, तमालपत्र याचे पीक मलनाडच्या वनराईत होते.

कोंदणात पाचू बसवावा त्या प्रमाणे हिरवेगार दिसणारे बदामी गाव. चालुक्यांच्या या राजधानीत पहिल्या पुलकेशीने किल्ला बांधला. येथील गुहांमधील शिल्पकला पाहण्यासारखी आहे. विष्णू आणि हरिहर यांच्या मूर्ती त्या काळच्या भव्यतेची साक्ष देतात. पौष महिन्यात येथील बनशंकरीच्या मंदिरात लाखो लोक दर्शनाला येतात आजूबाजूला दाटवनराई व पुष्करण्या असणारे हे मंदिर बनशंकरी हे नाव सार्थ करते.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS



बदामीच्या जवळच ऐहोळे व पट्टदकल्ल या ठिकाणी प्राचीन काळातील शिल्पकलेचे उत्तम नमुने पहावयास मिळतात.

चालुक्यांनी नामकरण केलेले विजयापुरा आदिलशहाच्या राजवटीत भरभराटीस आले. मुस्लीम शैलीतील उत्तम वास्तुशिल्पे याच कालावधीत निर्माण झाली. दक्षिण भारतातील ताजमहाल म्हणून ओळखली जाणारी इब्राहिम रोजा ही वास्तू तसेच विजयापुरा येथील विश्व विख्यात असा 120 फूट व्यासाचा गोलघुमट हा भारतातील सर्वात मोठा अर्धगोल आहे. या घुमटामध्ये प्रतिध्वनी ऐकू येतो. गगनमहल, बाराकमान या सारख्या इमारती येथे आहेत. 55 टन वजनाची मुलूख मैदान तोफ व मोगल कालीन विहिरी पर्यटकाना आकर्षित करतात.

उत्तर कर्नाटकातील घनदाट वनराई व समुद्र किनारे भटकंती करणाऱ्यांना खुणावतात. शिवमोग्गा जिल्ह्यातील जोगचा धबधबा देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करतो. 298.8 मीटर उंचीवरून शरावती नदी राजा, रोरर, रॉकेट अणि राणी या चार भागात विभागून कोसळते. पावसाळ्यात या प्रपाताचे रौद्र तरीही गंभीर रूप पाहण्यास लोकांची खूपच गर्दी होते. 1948 साली या ठिकाणी महात्मा गांधी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



जलविद्युत केंद्र उभारण्यात आले. येथे जाण्यासाठी विजेवर चालणाऱ्या घसरगाडीतून उतरण्याची सोय आहे. तो अनुभव घेताना अक्षरशः छातीचा ठोका चुकतो. धबधब्याचे पाणी वरून पडत असताना ते पांढऱ्याशुभ्र कापसाप्रमाणे दिसते. त्याचे तुषार उंच उडत असतात. त्यावर पडलेल्या सूर्य किरणामुळे एकाच वेळी तीन-चार इंद्रधनुष्य तयार होतानाचे नयनमनोहर दृष्य दिसते. हा भारतातील सर्वात उंच धबधबा आहे.

यल्लापूर तालुक्यातील दुर्गम असे भैरवक्षेत्र याण हे साहसी भटक्यांचे आवडते ठिकाण आहे. एका बाजूला खोल दरी, एका बाजूस उंचडोंगर, घनदाट झाडी असणाऱ्या अरूंद पायवाटेवरुन जाताना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. फक्त पायरव आणि अगदी दिवसाही रातकिड्यांची किर्र ऽऽऽ किर ऽऽ या आवाजाबरोबर आपल्याला पायपीट करावी लागते. पण काही अंतर गेल्यावर आपल्या तोंडून आपोआपच अरे वा! असे उद्‌गार बाहेर पडतात. अगदी सूईच्या टोकाप्रमाणे निमुळते होत गेलेले दगडाचे उंचच उंच सुळके पाहून डोळे विस्फारतात. दरीत असणारी ही निसर्ग निर्मित शिल्पे, आजूबाजूची घनदाट वनराई, मधूनच उडणारे पक्षी, नीरव शांतता पाहून एखाद्या अद्‌भूत ठिकाणी आल्याप्रमाणे वाटते. दरीत भैरव, शिवपार्वतीचे मंदिर आहे. गुहेत असलेल्या या मंदिराला प्रदक्षिणाही गुहेतूनच घालावी लागते. छतावर झिजलेल्या दगडातून पाझरणारा सुर्यप्रकाश झुंबरे लावल्या प्रमाणे दिसतो. या ठिकाणी शहरातील झगमगाट नाही, दुकाने नाहीत की गर्दी नाही. तरीही हे स्थळ पर्यटकांना आकर्षित करते.

© MOTHER'S PUBLISHERS

सागर, कुमठा या भागातील कारागीर चंदन आणि हस्तीदंताच्या कोरीव कामासाठी प्रसिद्ध आहेत. कर्नाटकच्या सुप्रसिद्ध हस्तकला म्हणजे चंदनाच्या लाकडावरील कोरीव- काम. शिसवीच्या लाकडात कोरून बसवलेल्या नक्षीदार, हस्तीदंती वस्तू, मातीच्या रंगवलेल्या वस्तू, बिदरचे बिद्रीकाम, रेशमी कपडा व त्यावरील कशीदा ही कर्नाटकाची वैशिष्टये आहेत. करावली प्रदेशातील यक्षगान, दशावतारी नाटके या बद्दल जगभर कौतुकाने बोलले जाते.

कर्नाटकात येणारा पर्यटक मलनाडच्या मसाल्याचा स्वाद,मैसूरुच्या चंदनाचा सुगंध, कारवारच्या शहाळ्याचा गारवा, धारवाडच्या पेढयांचा व बेळगावीच्या कुंद्याचा गोडवा आपल्या बरोबर घेऊन जातो, ते पुन्हा एकदा परत येण्याचा निश्चय करूनच.

नवीन शब्दांचा अर्थ :

दख्खनचे पठार - दक्षिणेचे पठार (दख्खन हा शब्द फार्सी आहे.)

पर्यटनस्थळ - सहलीला जाऊन भेट देण्यासारखे स्थळ, पाहून येण्यासारखे स्थळ.

सिलिकॉन सिटी - (इंग्रजी शब्द) कॉम्प्युटरच्या क्षेत्रात प्रसिद्ध स्थळ.

कुटिरोद्योग - घरगुती उद्योग, (केरसुण्या, नारळाच्या काडयांच्या झाडण्या, दगडी पाटा वरवंटा इ. वस्तू बनविणे)

वनराई - जंगल, अरण्य

छातीचा ठोका चुकणे - खूप भीती वाटणे

दुर्गम - एखाद्या ठिकाणी जाऊन पोहचण्यास अवघड ठिकाण

पायरव - पायांचा आवाज

मलनाड - (कन्नड शब्द) मळे - पाऊस, नाडू-प्रदेश, मलनाडू - भरपूर पावसाचा प्रदेश.

पर्यटक - प्रवासी

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

हस्तीदंती - हत्तीच्या दातापासून बनविलेल्या

पुष्करणी - हौद, कुंड

दुतर्फा - दोन्ही बाजूनी

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. करीनाडू हे नाव कशावरून पडले ?
2. आपल्या राज्याची राज्यभाषा कोणती ?
3. कर्नाटकाचा राजवृक्ष कोणता ?
4. कोंदणातील पाचू असे कोणाला म्हटले आहे ?
5. प्राचीन काळातील शिल्पकलेचे उत्तम नमुने कोठे पहावयास मिळतात ?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. कर्नाटकास सुवर्णभूमी असे का म्हणतात ?
2. कर्नाटकाच्या हस्तकलेविषयी लिही.
3. कर्नाटकात येणारा पर्यटक सोबत काय घेऊन जातो ?
4. कर्नाटकातील अभयारण्यांची नावे लिही.
5. विजयापुरातील वास्तूशिल्पकलेची वैशिष्ट्ये लिही.

इ. खालील प्रश्नांची उत्तरे चार पाच वाक्यात लिही.

1. बेंगलूरु शहराचे वर्णन कर.
2. म्हैसूरु शहराचे वर्णन कर.
3. भैरवक्षेत्रयाण या पर्यटन स्थळाबद्दल सविस्तर लिही.
4. तू भेट दिलेल्या पर्यटन स्थळाची माहिती लिही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. खालील शब्दांचे जोडशब्द लिही.

1. सुजलाम -
2. भव्य -
3. नयन -
4. निसर्ग -
5. हरि -
6. मन -

उ. विरुद्धार्थी शब्द लिही.

1. परदेशी ×
2. प्रगती ×
3. सुगंध ×
4. कृत्रीम ×
5. अरूंद ×
6. कौतुक ×

ऊ. वाच व समजून घे.

मुबंई	-	गेट वे ऑफ इंडिया	आग्रा	-	ताजमहल
दिल्ली	-	लाल किल्ला	बेंगलोर	-	इस्कॉन मंदिर
पंजाब	-	सुवर्ण मंदिर	म्हैसूर	-	वृंदावन गार्डन
हैद्राबाद	-	रामोजी फिल्म सिटी	कलकत्ता	-	हावडा ब्रीज

उपक्रम : * तू कोणकोणत्या ठिकाणी भेट देऊन आलास त्या ठिकाणांची नांवे लिही.

* प्रेक्षणीय स्थळाना भेटी देऊन त्या ठिकाणचे फोटो जमा करून तुझ्या वहीत चिकटव.

*** हे असेच लिही.**

हरीण, सुसकारा, सर्रास, भगीरथ, वैशिष्ट्य

सर्वनाम

खालील परिच्छेद वाचा -

इयत्ता सहावीच्या वर्गात मानसी शिकते. मानसी एक प्रामाणिक मुलगी आहे. मानसीने रांगोळी स्पर्धेत भाग घेतला. त्यात मानसीला पहिला क्रमांक मिळाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मानसीच्या मावशीने मानसीला एक छान पेन बक्षिस दिले.

आता खालील परिच्छेद वाच.

इयत्ता सहावीच्या वर्गात मानसी शिकते. ती एक प्रामाणिक मुलगी आहे. तिने रांगोळी स्पर्धेत भाग घेतला. त्यात तिला पहिला क्रमांक मिळाला. तिच्या मावशीने तिला एक छान पेन बक्षिस दिले.

वरील दोन्ही परिच्छेद वाचल्यानंतर लक्षात येईल की पहिल्या परिच्छेदात मानसी हे नाव वारंवार आले आहे. दुसऱ्या परिच्छेदात मानसी या नावाच्या ऐवजी ती, तीने, तिला, तिच्या या शब्दांचा वापर केला आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की. **नामाबद्दल येणाऱ्या शब्दाला सर्वनाम असे म्हणतात.**

सर्वनामाचे प्रकार

1. पुरूषवाचक सर्वनाम 2. दर्शक सर्वनाम 3. प्रश्नार्थक सर्वनाम

पुरूषवाचक सर्वनामे

	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	मी	आम्ही
द्वितीय पुरुष	तू	तुम्ही
तृतीय पुरुष	तो, ती, ते	ते, त्या, ती

* दर्शक सर्वनामे.

खालील वाक्य वाच.

अ) **हा** मुलगा बघ.

आ) **ही** गाय चांगली आहे.

इ) **हे** पुस्तक घे.

ई) **तो** खड्डा मोठा आहे.

उ) **ती** गाडी वेळेवर येते.

ऊ) **ते** फूल सुंदर आहे.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

जवळची एक वस्तू दर्शविताना आपण हा, ही, हे, यांचा वापर करतो आणि अनेक वस्तू दर्शविताना आपण हे, हया, ही यांचा वापर करतो. त्याच प्रमाणे दूरची वस्तू दर्शविताना तो, ती, ते आणि दूरच्या अनेक वस्तू दर्शविताना ते, त्या, ती यांचा वापर करतो वस्तू दर्शविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व नामाना **दर्शक सर्वनामे** म्हणतात.

❊ प्रश्नार्थक सर्वनामे

खालील वाक्ये वाच.

1) तुम्हाला किती लाडू हवे आहेत?
2) त्या दारामागे कोण लपले आहे?
3) मी कधी येऊ?
4) राजू कुठे गेला आहे?
5) तुम्ही आमच्या घरी केव्हा येणार?

वरील वाक्यातील किती, कोण, कधी, कुठे, केव्हा या प्रकारच्या सर्वनामाना **प्रश्नार्थक सर्वनामे** म्हणतात.

1. आम्ही या शाळेत शिकतो.
2. ताई कधी येणार?
3. हा माझा भाऊ आहे.
4. तो लाल पतंग माझा आहे.

वरील वाक्यातील सर्वनामांची वर्गवारी करून तक्ता भर.

दर्शक सर्वनाम	
पुरूषवाचक सर्वनाम	
प्रश्नार्थक सर्वनाम	

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



16. संवादिनी

H7B9F8

भारतीय उपखंडामध्ये संवादिनी हे एक अतिशय लोकप्रिय आणि सर्वत्र आढळून येणारे स्वर-वाद्य आहे. अगदी राष्ट्रपती भवनात होणाऱ्या एखाद्या मैफिलीत ते असू शकते आणि रस्त्यावर गाणाऱ्या माणसाच्या हातात देखील ते असू शकते. शास्त्रीय संगीताची मैफिल, गझल, भजन, चित्रपट संगीत, गुरुबानी संगीत, कव्वाली, चर्च, नाटक, संगीत वर्ग आदि ठिकाणी ह्या वाद्याचा वापर आज होताना दिसतोच. तुम्हीही हे वाद्य पाहिले असेल, कदाचित वाजवून पाहण्याचा प्रयत्न देखील तुम्ही केला असेल.

भारतामध्ये हे वाद्य इतके रुजलेले आहे की हे वाद्य भारतातच तयार झाले आहे असे वाटण्याची शक्यता आहे. हे वाद्य तयार झाले ते युरोप खंडातील फ्रान्स ह्या देशात. ह्या वाद्याची मूळ कल्पना ही पाइप-ऑर्गन ह्या वाद्यापासून आली. 19 व्या शतकात चर्चमध्ये पाईप-ऑर्गन ह्या वाद्याचा उपयोग गाण्याच्या साथीला व्हायचा. पाईप-ऑर्गन हा एका ठिकाणी स्थापन केलेला असायचा. तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हे अशक्य असायचे आणि त्याची किंमत खूपच असायची. छोट्या चर्चमध्ये पाईप-ऑर्गन मावायचा नाही आणि किंमत पाहिली तर तो परवडायचा देखील नाही.

1842 साली ॲलेक्झांडर फ्रँकॉईस ड्युबेन ह्या संगीत तज्ञाने 'हार्मोनियम' (पायपेटी) हे वाद्य तयार केले. ऑर्गनच्या मानाने हे वाद्य छोटे होते. पाईप-ऑर्गनमधील पाईप ऐवजी त्याने पितळी पिपाण्यांचा वापर पायपेटीमध्ये केला. तुम्ही झाडाच्या पानापासून पिपाणी तयार करून वाजवून पाहिली आहे का? हवा फुंकल्याबरोबर पिपाणीतून आवाज येतो. अशा प्रकारच्या पिपाणीला इंग्रजीमध्ये रीड (Valve) असे म्हणतात. ड्युबेनने एका छोट्या पेटीमध्ये स्वरांचे पितळी रीड तयार करून ते क्रमाने बसविले. हवेचा दाब निर्माण करण्यासाठी त्याने कातड्याच्या भात्याचा उपयोग केला. भात्याला एक झडप (Valve) बसवून रीडकडे हवा ढकलली जाईल अशी सोय केली. सर्व रीड्स एकदम वाजू नयेत म्हणून रीडला त्याने प्रत्येकी एक झडप बटन दाबून उघडली की त्या स्वराचा रीड वाजायला

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

लागायचा, असे हे यंत्र तयार झाले. त्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की भाता दाबायचा बंद झाल्याबरोबर वाद्याचा स्वर बंद व्हायचा. थोडा काळ स्वर लांबविता यावा ह्यासाठी त्याने कातड्याचाच आणखी एक पोट-भाता बसविला. मुख्य भाता दाबल्यामुळे आत आलेली जास्तीची हवा पोटभात्यात काही वेळ साठविली जाते. मुख्य भाता दाबण्याचे बंद झाल्यानंतर काही काळ पोटभात्यातून हवेचा पुरवठा होतो आणि स्वर वाजत राहतात.

काही वर्षातच हे वाद्य युरोप आणि अमेरिकेमध्ये खूप लोकप्रिय झाले. उचलून नेता येण्यासारखे असल्यामुळे सहलीला जाताना करमणूकीसाठी हे वाद्य नेण्यात येऊ लागले. एवढेच नव्हे तर युद्धावर जाणारे सैनिक देखील याचा वापर करू लागले. अगदी साध्या माणसापासून ते मोठमोठ्या संगीतकारापर्यंत सर्वजण ह्या वाद्याचा खूप वापर करू लागले. पॅरिस आणि जर्मनी मध्ये तयार झालेली कंपिका ह्या वाद्यामध्ये वापरली जायची.



हे वाद्य भारतात कसे आले? काही जण म्हणतात की पारशी नाटक कंपन्यानी हे वाद्य भारतात आणले. ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी हे वाद्य भारतात आणले असे काही जण म्हणतात. भारतात नाटक करणारे जे काही संघ होते त्यांनी ह्या वाद्याचा सर्वप्रथम उपयोग करून घेतला. त्यानंतर कीर्तनात त्याचा शिरकाव झाला. काही काळानंतर शास्त्रीय संगीत गायकानी साथीसाठी त्याचा वापर केला आणि ते वाद्य त्याना देखील पटले.

आता आपण जी संवादिनी पाहतो त्यापेक्षा पायपेटी ही आकाराने खूप मोठी होती. पायपेटीची रचना ही पाश्चात्य संगीताला साजेशी आहे. त्यामुळे खुर्चीवर बसून पायानी भाता चालवून दोन्ही हातांनी पायपेटी वाजविली जाते. दोन्ही हातानी पायपेटी वाजविल्यामुळे पाश्चात्य संगीतासाठी आवश्यक असा अनेक स्वरांचा संवाद (Harmony) साधला जातो. भारतीय संगीतामध्ये अशा प्रकारच्या स्वरसंवादाला अगदीच महत्व नाही. कलकत्त्याचे हे वाद्य आणखीन लोकप्रिय झाले. त्यानंतर कुकड, वालूकड, पालीठाणा, भावनगर इ. गावामध्ये त्याची रीड्स तयार होऊ लागली.

NOT TO BE REPUBLISHED © KTB

आज हे वाद्य इतर कोणत्याही देशात फारसे पहायला मिळत नाही पण भारतामध्ये हे वाद्य अतिशय लोकप्रिय आहे. ज्या माणसाला गाण्याची कल्पना आहे तो थोड्या प्रयत्नाने हे वाद्य वाजवायला लागतो हे ह्या वाद्याचे वैशिष्ट्य आहे. इतर वाद्यांवर पहिलाच स्वर व्यवस्थितपणे ऐकू येण्यासाठी खूप प्रयत्न करावा लागतो, पण संवादिनीचा भाता ओढून कोणत्याही पट्टीवर बोट ठेवा, स्वर वाजतो. पट्ट्या ठराविक क्रमाने वाजविल्या की एखादे गाणे ऐकू येते हे कळते आणि नकळत आपण हे वाद्य शिकत जातो.

भारतामध्ये ह्या वाद्याचा अभ्यास गेली 100 वर्षे सुरु आहे. पं. गोविंदराव टेंबे, पं.विठ्ठलराव कोरगांवकर, पं. मधुकर पेडणेकर, पं. मनोहर चिमोटे, पं. हनुमंतराव वाळवेकर, पं. ज्ञानप्रकाश घोष, पं. तुलसीदास बोरकर, पं. पुरुषोत्तम वालावलकर, पं. आप्पा जळगांवकर, पं. वसंत कनकापुर आदि संवादिनी वादकांची नावे आज जगभर प्रसिद्ध झालेली आहेत. त्यामधीलच एक अग्रगण्य कलाकार आपल्या बेळगावीत राहात होते. त्यांचे नाव कदाचित तुम्ही ऐकले असेल. ते होते पं. रामभाऊ विजापूरे. पं. रामभाऊ विजापूरे हे नाव संगीत जगतात आदराने घेतले जाते. आज त्यांचे अनेक शिष्य संवादिनीवादन आणि गायन ह्या दोन्ही कलाप्रांतामध्ये नाव मिळवून आहेत.

सा	रे	ग	ग	ग	ग	ग	ग	ग	ऽ	ग	ग	रे	ग	म	ऽ	ग	ऽ	ग	ग	रे	ऽ	रे	रे	नि	रे	सा
ज	न	ग	ण	म	न	अ	धि	ना	ऽ	य	क	ज	य	हे	ऽ	भा	ऽ	र	त	भा	ऽ	ग्य	वि	धा	ऽ	ता

सा	प	ऽ	प	प	ऽ	प	प	प	प	ऽ	प	म	प	ऽ	धप	म	म	ऽ	म	म	ग	ग	ग	रे	म	ग
पं	जा	ऽ	ब	सिं	ऽ	ध	गु	ज	रा	ऽ	त	म	रा	ऽ	ठा	ऽ	द्रा	ऽ	वि	ड	उ	त्क	ल	वं	ऽ	ग

- श्रीधर कुलकर्णी

नवीन शब्दार्थ:

संवादिनी	- वाद्याचा एक प्रकार (पेटी)	शिरकाव	- प्रवेश करणे
मैफिल	- संगीत सभा	अग्रगण्य	- प्रमुख
पाईप ऑर्गन	- जुन्या काळातील संवादिनी	गझल	- गाण्याचा एक प्रकार

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. भारतीय उप खंडातील लोकप्रिय स्वर वाद्य कोणते ?
2. सर्वप्रथम संवादिनीचा वापर कोणत्या देशात झाला ?
3. हार्मोनियम हे वाद्य कोणी तयार केले ?
4. 'रीड' म्हणजे काय ?
5. बेळगावमधील प्रसिद्ध संवादिनी वादकाचे नाव लिही.

आ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. संवादिनीची मूळ कल्पना _____ या वाद्यापासून आली.
2. संवादिनीचा शोध _____ साली लागला.
3. स्वर लांबविता यावा यासाठी संवादिनी मध्ये _____ बसविण्यात आला.
4. संवादिनीची 'रीडस' कुकड_____ व _____ या ठिकाणी तयार होतात.
5. भारतामध्ये या वाद्याचा अभ्यास _____ वर्षे सुरू आहे.

इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. संवादिनीची लोकप्रियता कशी वाढली ?
2. संवादिनी भारतात कशी आली ?
3. भारतातील जगप्रसिद्ध संवादिनी वादकांची यादी कर.

ई. गटात न जुळणाऱ्या शब्दाभोवती गोल कर.

1. तबला, मृदंग, ढोल, संवादिनी.
2. बासरी, टाळ, सनई, पिपाणी.
3. माऊथ ऑर्गन, विणा, तंबोरा, सतार.
4. कथ्थक, लावणी, भरतनाट्यम, यक्षगान.
5. पं.गोविंदराव, पं.रामभाऊ, पं. भिमसेन जोशी, पं.पुरषोत्तम

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उ. खालील वाक्ये पाठानुक्राने लिही.


1. द्वारकानाथ घोष यांनी हातपेटी तयार केली.
2. पारशी नाटक कंपन्यानी हे वाद्य भारतात आणले.
3. अलेक्झांडर फ्रँकॉईस ड्युबेन यांनी पाय पेटी हे वाद्य तयार केले.
4. पं रामभाऊ विजापूरे हे नांव संगीत जगतात आदराने घेतले जाते.
5. संवादिनीची मूळ कल्पना पाईप ऑर्गन या वाद्यापासून आली.

ऊ. खालील शब्द वाक्यात उपयोग कर.

1. करमणूक -
2. शास्त्रीय संगीत -
3. प्रसिद्ध -

ए. खाली दिलेल्या चित्रासमोर कंसातील प्रसिद्ध वादकांची नांवे निवडून लिही.

(बिस्मील्ला खाँ, झाकीर हुसेन, पं. हरिप्रसाद चौरासिया पं. रविशंकर, पं. रामभाऊ विजापूरे, शिवकुमार शर्मा.)

1. 
2. 
3. 
4. 
5. 
6. 

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऐ. उदाहरणात दाखविल्याप्रमाणे वाद्याचा प्रकार लिही.

1. संवादिनी - स्वरवाद्य
2. ढोलकी -
3. वीणा -
4. नगारा -
5. माऊथ ऑर्गन -
6. व्हायोलीन -

उपक्रम :


* तुला माहिती असलेल्या वाद्यांची यादी कर.
  तसेच माहिती नसलेल्या वाद्यांची माहिती शिक्षक/पालकांच्या कडून करून घे.

* **हे असेच लिही.**

श्रुत, वेषभूषा, ठरावीक, ध्रुवपद.

खाली दिलेला उतारा वाचून समजून घे. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.

संवादिनी महर्षी पं. रामभाऊ विजापूरे मास्तर



संवादिनीसाठीच घडविलेलं विजापूरे मास्तर हे व्यक्तिमत्त्व होते. हात अतिशय कोमल, लांब सडक गोलाकार वळलेली बोटं, बोटांच्या टोकांचाच पेटीच्या पट्ट्यांना स्पर्श व्हायचा. मास्तर पेटीचं उत्तम ट्यूनिंग करायचे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मास्तरांच्या शिष्यांनी 1991 मध्ये श्रीराम संगीत महाविद्यालयाची सुवर्ण जयंती साजरी केली. योगायोगाने मास्तरांचा 75 वा वाढदिवसही याच वर्षी झाला होता. या कार्यक्रमात बेळगावी आणि बेळगावीच्या बाहेरील प्रसिद्ध गायक आणि वादकांची संगीत सभा झाली.

मास्तरांचा सत्कार करण्यासाठी पद्मभूषण गंगूबाई हनगल उपस्थित होत्या. मास्तरांच्या जीवनात अनेक सन्मानीय पुरस्कार त्यांना मिळाले. त्या पैकी टी. चौडय्या प्रशस्ती, कर्नाटक राज्य संगीत विद्वान, आणि शेवटी महामहोपाध्याय या उपाधीने त्यांना भूषविले गेले.

मास्तरांचे शिष्य श्री. रविंद्र काटोटी यांनी बेंगळूरु येथे विजापूरे हार्मोनियम फौंडेशनची स्थापना केली आहे. दर वर्षी श्री. काटोटी मास्तरांना वंदन करून 'हार्मोनियम सण' साजरा करतात.

आज मास्तर नाहीत. पण त्यांच्या शिष्य परंपरेने संवादिनी वादन करून मास्तरांचेच सूर अजरामर केले आहेत.

1. विजापुरे मास्तर हे व्यक्तीमत्व कसे होते?
2. 1991 मध्ये मास्तरांच्या शिष्यांनी काय साजरी केली?
3. मास्तरांच्या जीवनात त्यांना कोणकोणत्या प्रशस्तीने गौरविले गेले?
4. विजापूरे हार्मोनियम फौंडेशनची स्थापना कोठे झाली आहे?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

-विशेषणे-

पुढील शब्द समूह पहा -

चांगली मुले, काळा कुत्रा, हिरवे रान, पाच टोप्या, खूप लोक. वरील शब्द समुहात चांगली, काळा, हिरवे, पाच, खूप हे शब्द त्यांच्या पुढे येणाऱ्या नामाबद्दल विशेष माहिती सांगतात, म्हणून अशा प्रकारच्या शब्दाना विशेषणे म्हणतात. **नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण असे म्हणतात.**

आता पुढील उतारा वाचून त्यातील गुण विशेषणांची व संख्या विशेषणांची वर्गवारी करा.

आम्ही बागेत सहलीला गेलो होतो. त्या बागेत खूप फुले होती. पिवळी, पांढरी, गुलाबी, लाल आणि निळ्या रंगाची फुले होती. गुलाबाची सुंदर फुले डोलत होती. जाई-जुईची नाजूक फुले फुलली होती. बागेत एक छोटे तळे होते. तळ्यात मासे होते. मी दहा मासे मोजले. तळ्याकाठी एक मोठे वडाचे झाड होते. दोन उंच नारळाची झाडे होती. लोकानी काही खाऊन प्लॅस्टिक वगैरे तिथेच टाकले होते. सुंदर बागेत ते खूपच घाण दिसत होते. मी सर्व प्लास्टिक गोळा करून कचरा पेटीत टाकले.

गुणविशेषणे	संख्या विशेषणे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

❊ **लक्षात ठेव.**

1. सर्व रंग, वास, चवी, चांगले गुण, वाईट गुण दाखविणारे शब्द म्हणजे गुण विशेषणे.
2. सर्व संख्या, कमी अधिक प्रमाण दाखविणारे शब्द म्हणजे संख्या विशेषणे.

17. एक होती अवकाश कन्या



'स्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे. फक्त तो शोधायची दृष्टी आणि धैर्य तुमच्या अंगी असायला हवे' असे सांगणारी आणि प्रत्यक्षात कृतीत आणणारी अवकाश कन्या कल्पना चावला ही सर्व स्त्री जातीला प्रेरणा ठरते. आपला इतिहास हा प्रसिद्ध व्यक्ती आणि त्यांची असामान्य अशी कर्तृत्वशाली परंपरा यानी भरलेला आहे. मैत्रेयी, गार्गीपासून ते झाशीची राणी लक्ष्मीबाई, वीरराणी कित्तूर चन्नम्मा यांनी इतिहासाची पाने अजरामर केली आहेत. अशीच एक तेजस्वी कन्या कल्पना चावला! तिच्या कर्तृत्वालाही सीमा नाही, तोड नाही. भारताचे नाव अवकाश पराक्रम यादीत समाविष्ट करणारी कल्पना आम्हा सर्व भारतीयांचा सार्थ अभिमान आहे.

कल्पनाचा जन्म 1 जुलै 1961 रोजी कर्नाल येथे झाला. वडिलांचे नांव बनारसीलाल व आईचे नांव संयोगिता. या दांपत्याला पहिल्या दोन मुली सुनिता, दीपा. मुलगा संजय व शेंडेफळ कल्पना! बालपणापासूनच बाह्य जगात रमणारी अवखळ अशी कल्पना बहिणीबरोबर घरात रमण्याऐवजी भावाबरोवर धांगडधिंगा

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

घालण्यात अधिकच रममाण होत असे. तसे तिला हट्टी म्हणता येणार नाही, पण आपले म्हणणे खरे करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असे. शाळेत एक हुशार विद्यार्थीनी म्हणून कल्पनाची ख्याती होती. मुळातच स्वभावाने धाडसी असलेल्या कल्पनाला सायकलवरून पायडल मारत चेहऱ्यावर येणाऱ्या वाऱ्याचे झोत झेलणे खूप आवडे. हा तिचा छंदच होता. तिचे हे वाऱ्याचे वेड शेवटपर्यत तिचे सोबत्त करीत राहिले.

माध्यमिक वर्गात शिकत असताना तिने एक भलेमोठे पोस्टर बनविले. हे पोस्टर म्हणजे तिच्या भावी जीवनाचे ध्येयच होते. त्यामध्ये आकाशात उडणारी विमाने, अवकाश याने आणि ग्रह ताऱ्यांची चित्रे होती. तेव्हापासूनच आकाशात उडण्याचे स्वप्न बीजरूपाने तिच्या मनात पेरलेले होते. उत्तम गुणांनी आपला माध्यमिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कल्पनाने कर्नालच्या दयालसिंग कॉलेज मध्ये पदवीपूर्व शिक्षण घेतले. येथे सुद्धा उत्तम गुण प्राप्त करून तिने चंदीगडच्या पंजाब इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळविला. येथे सुद्धा तिचे असामान्य धैर्यच दिसून येते. तिला मेकॅनिकल अथवा इलेक्ट्रीकल हा विषय घेण्यास सुचविले. पण सर्वांनी तुडविलेली वाट परत तुडविणारी ती कल्पना कसली? विमान उडविण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने 'एरॉनॉटिक्स' हा विषय निवडला. वैमानिक नाही तर निदान विमानाचे तंत्रज्ञान तरी शिकावे अशी तडजोड तिने केली.

इंजिनीअरिंगच्या शेवटच्या परीक्षेत देदीप्यमान यश मिळविले. इथेच थांबणे तिला मंजूर नव्हते. कॉलेजात शिकविण्याची नोकरी सोडून तिने अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्याचा निर्धार केला. त्यासाठी तिला वडिलांची, आपल्या कुटूंबाची मनधरणी करावी लागली. अखेर तिच्या हट्टापुढे वडील नमले. 28 ऑगस्ट 1982 रोजी अमेरिकेत जाण्यास कल्पनेच्या विमानाने उड्डाण केले. अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास' अर्लिंग्टन येथे कल्पनेचे एरोस्पेस इंजनिअरिंग विषयात पदव्युतर शिक्षण सुरू झाले. याच दरम्यान तिची जीन पियरे हैरिसन या अमेरिकन तरूणाशी ओळख झाली. अनुरूप अशा जेपीशी तिचा पुढे 1984 साली विवाह झाला.

NOT TO BE REPUBLISHED ©KSFS

आता टेक्सास सोडून ती बोल्डर या गांवी रहायला गेली. विमान उडवायच्या छंदात तिने लक्षणीय प्रगती केली. पुढचा टप्पा गाठण्यासाठी नासाच्या संशोधन विभागात तिने संशोधकाची नोकरी सुरू केली. पण आपल्या ध्येयाचा तिला विसर पडला नव्हता. वयाच्या तिशीनंतर तिने नासाच्या संशोधन विभागातून अवकाश यात्री विभागात प्रवेश मिळविला. सन 1994 मध्ये त्या विभागात सुद्धा ती निवडली गेली.

ह्यूस्टन येथील लिंडन जॉन्सन स्पेस सेंटरवर 1995 साली ती प्रशिक्षणासाठी रूजू झाली. येथील उत्तम कामगिरीमुळे अंतराळवीर म्हणून तिची निवड झाली. कल्पनाने आपल्या उड्डाणाची तयारी सुरू केली. विविध प्रशिक्षणे आणि चाचण्यातून ती पार पडली. ती कमांडर म्हणजे प्रमुख आणि फ्लाईट इंजिनिअर होती. कल्पनाने उराशी बाळगलेले वर्षानुवर्षाचे स्वप्न एकदाचे साकार झाले. तो दिवस होता 16 जानेवारी 2003. वेळ होती मंगलमय रम्य पहाट. आणि यान होते कोलंबिया!



@KTBS TO BE REPUBLISHED

यान अवकाशात झेपावले त्यावेळी यानात कमांडर आणि इंजिनिअरच्या खुर्चीत कल्पना विराजमान होती! उड्डाणानंतर 9 मिनीटांनी कोलंबीयाच्या पृथ्वी प्रदक्षिणा सुरू झाल्या. यान स्थिर झाल्यानंतर अवकाश यात्रीनी हुश्श करीत आपला केशरी रंगाचा पोशाख उतरवून साध्या जीन्स, टीशर्टमध्ये आले. त्यांना नेमून दिलेल्या ऐंशीच्यावर प्रयोगाना सुरूवात झाली व ते पारही पडले.

आपल्यावर सोपविलेले काम पार पाडून कोलंबीयाने परतीची तयारी सुरू केली. शनिवार दिनांक १ फेब्रुवारी २००३. स्थानिक वेळ ९ वाजून १६ मिनीटे निश्चीत केली. नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला आणि सेकंदाचा हिशेब पाळत कल्पनाने पृथ्वीवर परतण्यासाठी संगणकीय प्रक्रिया सुरू केली. पण नियतीला कल्पनाचे हे यश पाहवले नाही. नियोजीत वेळेआधिच १६ मिनीटे कोलंबीयाचा आणि कक्षाचा संपर्क तुटला. जमीनीपासून ६० कि.मी. उंचीवरच यानाचा स्फोट झाला. जणू विद्युलता क्षणभर चमकून आकाशात लुप्त होते, त्या प्रमाणेच कल्पनेचे जीवन अवकाशाच्या काळ्या गडद पोकळीत अंतर्धान पावले. साऱ्या भारतीयांना दु:ख सागरात लोटून ही विद्युल्लता लुप्त झाली. या कल्पनेला, अवकाश कन्येला लाख लाख प्रणाम!

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शब्दार्थ

कर्तृत्व - कार्य

ख्याती - प्रसिद्धी

देदीप्यमान - असामान्य, डोळे दिपवणारे कार्य

लक्षणिय - लक्षात राहण्यासारखे

विद्युलता - वीज

लुप्त - गुप्त होणे, नाहीसे होणे

वाच व समजून घे.

नासा - इस्त्रो -

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे 1-2 वाक्यात लिही.

1. कल्पना चावलाचा जन्म केव्हा झाला?
2. तिच्या आईवडिलांचे नाव काय?
3. लहाणपणी कल्पनाला कोणता छंद होता?
4. इंजिनिअरिंग कॉलेजात तिने कोणता विषय निवडला?
5. कल्पना चावलाचा विवाह कोणाशी झाला?
6. अवकाश यात्रेत ती कोणत्या पदावर होती?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे 3-4 वाक्यात लिही.

1. कल्पना चावलाच्या कुटूंबाविषयी थोडक्यात लिही.
2. भारतीयाना कल्पना चावलाचा सार्थ अभिमान का आहे?
3. कल्पना चावलाचा स्वभाव कसा होता?
4. कल्पनाची अंतराळवीर म्हणून कोणत्या कारणामुळे निवड झाली?
5. अवकाश कन्या कल्पना चावलाचा शेवट कसा झाला?

इ. रिकाम्या जागा भर.

1. कल्पना चावलाचा जन्म _____ येथे झाला.
2. कल्पनाच्या दोन बहिर्णींची नावे _____ व _____ अशी होती.
3. विमान उडविण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने _____ हा विषय निवडला.
4. कोलंबिया हे यान _____ या दिवशी अवकाशात झेपावले.
5. कल्पना आणि तिच्या सहकाऱ्यानी _____ यानातून अवकाश यात्रा केली होती.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ समजून घे व वाक्यात उपयोग कर.

अंतर्धान पावणे - नाहीसे होणे

टप्पा गाठणे. -

साकार होणे.-


निर्धार करणे. -

रुजू होणे. -

* **हे असेच लिही :**

अद्‌भूत, अंमलबजावणी, उद्‌ध्वस्त, देदीप्यमान, पुनःप्रक्षेपण.

* **खालील शब्दकोडे पाठातील शब्दांच्या आधाराने पूर्ण करा.**



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आडवे शब्द	उभे शब्द
1. कॉम्पुटरचे मराठी नाव	1. नेहमी एकमेकाशी ठेवणे.
5. अग्निबाणाचे इंग्लीश नाव	2. भारतीय अवकाश कन्या.
6. पेहराव, ड्रेस	3. खट्याळ
9. एक होती - .....कन्या	4. कल्पना चावलाने उच्च शिक्षणासाठी निवडलेला विषय
10. आकाशात भरारी घेणे.	7. कल्पना चावलाचे दुर्घटनाग्रस्त यान
12. सूर्य, चंद्र, पृथ्वी, एका सरळ रेषेत आल्यावर घडते.	8. भारताचा तिसरा कृत्रिम उपग्रह
13. भारताने अवकाशात पाठविलेला पहिला उपग्रह	11. भारताचा बहुद्देशीय उपग्रह
16. हरविलेले मिळविण्यासाठी केलेली कृती	14. शास्त्रज्ञ हे करतात त्याला म्हणतात
17. T.V. हे या प्रकाराचे उपकरण आहे.	15. सूर्याला समानार्थी शब्द व भारताचा उपग्रह
19. Technology या शब्दाला मराठी शब्द	17. पाहणे, नजर
	18. मशीन

NOT TO BE REPUBLISHED @KTRS

क्रियापद आणि काळ यांचा संबंध-

1. आम्ही परमेश्वराची रोज प्रार्थना **करतो.**
2. आमच्या शाळेने पहिले बक्षीस **जिंकले.**

वरील दोन्ही वाक्ये पहा - त्यातील ठळक अक्षरातील शब्द पहा.

करतो आणि **जिंकले.** या दोन शब्दातील मूळ शब्द कोणते असतील बरे.

कर या शब्दावरून करतो हा शब्द तयार झाला आहे.

कर या शब्दावरून आणखी कोण कोणते शब्द तयार करता येतील ते आता पाहू-

कर केले, करतात, करणार

1. आता 'जिंकले' या शब्दातील मूळ शब्द कोणता ते शोध पाहू.

2. 'जिंकले' या शब्दातील मूळ शब्द शोधल्या नंतर त्या शब्दापासून कोणकोणते शब्द तयार झाले? ते शब्द येथे लिही.

इयत्ता पाचवी मध्ये तुम्ही वर्तमान काळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ या बद्दल शिकला आहात. आता क्रियापदाचा आणि काळाचा संबंध कसा आहे ते पाहू.

क्रियापद- जा-वर्तमानकाळ -मी जातो, जा हा मूळ शब्द, जा शब्दावरून जातो हे बदलेले रूप .

क्रियापद-जा-भविष्यकाळ-मी जाईन, जा हा मूळ शब्द. जाईन हे बदललेले रूप.

क्रियापद-जा-भूतकाळ-मी गेलो, जा हा मूळ शब्द जा या शब्दावरून बदललेला शब्द-गेलो

अशाप्रकारे काळा प्रमाणे क्रियापदातील शब्दांची रूपे कशी बदलतात ते आपण पाहिले. आता दिलेल्या क्रियापदावरून कोणकोणते शब्द तयार होतात. ते पुढील तक्त्यात लिही.


क्रियापद	वर्तमान काळ	भूतकाळ	भविष्यकाळ
ये			
वाच			
लिही			
गा			
पी			
धाव			
कर			
नाच			

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



18. माझ्या लहानपणीची बाग

Q9Z2X5



बाळपणी मज फुलझाडांचा नाद असे फार,
केली होती मागीलदारी बाग मजेदार. ।।धृ।।


गुलाब, जाई, जुई, शेवंती, नाजूक निशिगंध,
मदनबाण, मोतीया, चमेली, लावियला कुंद,
नित्य सकाळी प्रेमभरे मी जलसिंचन करूनी
वाढविलीं जी झाडे, गेली कुसुमाही भरूनी ।। 1 ।।



फुललेली ती पुष्पवाटिका पाहुनि नयनाही,
हर्ष जाहला जो हृदयाला उपमा त्या नाहीं
कोकिळ, मैना, रावे, यावे पतंग वा भृंग,
ऐकुनि त्यांची मंजुळ गाणीं व्हावें म्या दंग ।।2 ।।

''नीट काळजी या बागेची माझ्या घे ताई''
ऐशी विनंती निज भगिनीला करूनी मी जाई.
वर्ष लोटलें, आलो फिरूनी अपुल्या सदनाला,
मागे जाऊन बाग पाहता खेद मना झाला. ।।3 ।।

''ती जाईची कोमल लतिका पाहुनि सुकलेली,
अश्रुजळाची वृष्टी तियेवर मोहभरें केली,
प्रिय विषयाला नको विसंबू प्राण जरी गेला!''
बाळपणींच्या बागेनें हा बोध मला केला ।।4 ।।



कवी-माधवानुज

© CBSE NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ.

मज	-	मला	भृंग	-	भूंगा, भ्रमर
नाद	-	छंद	खेद	-	दुःख, शोक
कुंद	-	एक पुष्पवेल	लतिका	-	वेली
वाटिका	-	बाग	जळ	-	पाणी
नयन	-	डोळा	वृष्टी	-	जलधारा, पाऊस
हर्ष	-	आनंद	मोह	-	आकर्षण
म्या	-	मी	बोध	-	ज्ञान
रावे	-	पोपट	जलसिंचन	-	पाणी शिंपडणे

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एक दोन वाक्यात उत्तरे लिही.

1. बाग कोठे तयार केली होती?
2. कविला बालपणी कोणता छंद होता?
3. बागेत कोणकोणती झाडे लावली होती?
4. बागेतील फुले पाहून कविला काय वाटते ?
5. बागेत कसे दंग व्हावे असे कवी म्हणतो?
6. बागेची जबाबदारी कोणावर सोपविली होती?
7. फिरून पुन्हा आल्यावर कविला दुःख का झाले?
8. बागेने कोणता बोध केला?

आ. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.

1. गुलाब जाई _____

_____

_____

_____ कुसुमांही भरूनी

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

2. ती जाईची कोमल _____

_____

_____

_____ हा बोध मला केला.

इ. समानार्थी शब्द लिही.

नाद	-	भृंग	-
कुसुम	-	सदन	-
नयन	-	खेद	-
हर्ष	-	लतिका	-

ई. खालील कवितेच्या ओळींचा अर्थ लिही.

फुललेली ती पुष्पवाटिका पाहुनि नयनांहीं,
हर्ष जाहला जो हृदयाला उपमा त्या नाहीं
कोकिळ, मैना, रावे, यावे पतंग वा भृंग,
ऐकुनि त्यांची मंजुळ गाणी व्हावे म्या दंग.

उ. ही कविता पाठ कर.

ऊ. तुमच्या सभोवतालच्या परिसरात आढळणाऱ्या फुलांची नांवे समजून घे व त्यांची यादी कर त्यांचा रंग लिही.

फूलाचे नांव	रंग
_____	_____
_____	_____
_____	_____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ए. खाली दिलेले शब्द त्या खाली दिलेल्या समानार्थी शब्दांनी सुद्धा ओळखतात. योग्य अशा अक्षरांनी रिकाम्या जागा भर.

1. फूल
   कु __ म
   __ म न
   पु __

2. डोळा
   न __ न
   __ क्षू
   __ क्ष

3. आनंद
   सं __ ष
   __ द

   तो __ __
   प्र मो __
   __ र्ष

4. घर
   स __ न
   __ व न

   धा __
   __ ल य

ऐ. खाली दिलेल्या शब्दसागरात वीस फुलांची नांवे दडलेली आहेत. ती ओळखून त्यांची यादी तयार कर.

अ	बो	ली	म	जु	प्रा	ज	क्ता
चा	फा	ली	जा	ई	चं	म्पा	के
गु	सू	र्य	फू	ल	मे	पे	व
ला	ल	स	दा	फू	ली	झें	डा
ब	कु	ळी	हा	मा	रा	डू	व
जा	मु	क	म	ळ	शे	शे	क
स्वं	दी	ठो	मो	ग	रा	वं	न्हे
दी	नी	शि	गं	धा	णी	ती	र

उदा : अबोली _____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____ _____

_____ _____ _____ _____ _____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ओ. खाली फुलांच्या नावांची पहिली अक्षरे दिली आहेत. त्यावरुन फुलांचे शब्द तोरण कर.

पा	नि	जा	जा	जु	क	रा	गु

उपक्रम:

* रोज सकाळी वृक्षदेवतेची पूजा कर व पाणी घालताना खाली दिलेला श्लोक म्हण.

  आयुर्बलं यशोवयः प्रजापशून् वसूनिच ।
  ब्रम्हप्रज्ञांच मेधांच, तन्नो देहि वनस्पते ।।

* तुझ्या घराच्या अंगणात/परसात लावलेल्या झाडांची काळजी कोण घेते. ती जबाबदारी तुझ्यावर सोपविली तर तू काय करशील?

* **हे असेच लिही.**

पश्चात्ताप, अधीन, नवीन, सीताफळ, मध्यांतर


* वाच व अर्थ समजून घे.

1. झाडे लावा झाडे जगवा.
2. दारोदारी एक झाड गावोगावी एक वन, देशाचे करू नंदनवन.
3. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे.
4. वृक्षारोपणाने करू निसर्गाचे जतन,
   वृक्ष संवर्धनाने होईल आरोग्य जतन.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

19. चुकलेले पांखरू

I6J4A8



जिवा : आये, का ग रडतीस अशी?

आई : काय सांगू बाळा! (डोळ्यातून आसवे पडत आहेत.)

जिवा : (डोळे पाण्याने भरलेले, केविलवाण्या स्वरात) ''आये, माजा बाबा कुठं गेला ग? कंदी यायचा तो परत?

आई : (दुःखी अंतकरणाने) जिवा, तुझे बाबा न्हाई यायचे बर आता! त्ये देवाच्यापाशी गेले-स्वर्गात गेले. तिथून कुणीबी परत येत न्हाई.

जिवा : पर तुला, मला इथ येकलं ठिवून ते गेले कसे? न्हाई, तू फसवतीस मला. लबाड बोलतीस, माजा बाबा असं न्हाई करायचा. तो तर लढाई कराय जातो म्हणून सांगून गेला.

आई : व्हय ते लढायलाच गेले होते. पर तिथं हे विस्कुट झालं, त्या शिवाजीच्या तलवारीनं जीव घेतला त्यांचा !

जिवा : कोण ग हा शिवाजी ? (कुतुहलाने विचारतो)

NOT TO BE REPUBLISHED

आई : हाय, विजापूर सरकारच्या एका जहागिरदाराचा पोर. सम्दी नावाजत्यात त्येला. त्यो म्हणं आपल्या लोकांचं राज्य आणणार हाये. पर मेल्यानं माझ कपाळ पांढर केलं. तुझ्या बाबांना मारलं.''

जिवा : कुठं असतो त्यो ?

आई : तो काय एका जागी ऱ्हातोय ? वाघासारखा त्यो आज इथं तर उद्या तिथं, सध्या आला हाये म्हणं तो गडावर - तो गड दिसतो तिथं ! पर तुला कशाला पायजे तो.

जिवा : जीव घेणार मी त्येचा. माज्या बाबाला मारलं ? आये, बाबानं गेल्या दसऱ्याला मला छोटी तलवार दिलीय, बसं, तिनचं चिरतो त्याची मुंडी !

आई : यडा कां काय तू ? काय तरी करायला जाशील अन् भलतंच गळ्यात यिवून पडल बरं ! झोप बरं आता, मोठ्ठी रात झाली आता.

(जिवाला घेऊन आई-झोपेची वाट बघत अंथरूणावर पडते. दोन रात्री जागल्यामुळे थोडयाच वेळेत आईला झोप लागते. पण तिच्या कुशितल्या जिवाचा जीव मात्र तळमळत होता. शिवाजीला कसं मारावं. याच विचाराचं थैमान मनात चाललं होतं, शिवाजीला गाठावं, कसा सापडेल, कसं मारावं, पण तो कुठं असणार ? आई म्हणती गडावर असणार ! चला तिथंच जाऊ या. झोपलेल्या आईच्या कुशीतून, जिवा अलगद उठतो आणि सावकाश पावले टाकीत बाहेर पडतो. चिमुकली तलवार लटकावून, अंधारातून गडाकडे निघतो. शिवाजीला मारायला काळया कुट्ट अंधारातून रात्रभर चालून तो गड गाठतो)

(पहिल्या चौकीपाशी असलेले पहारेकरी त्याला आडवतात.)

पहारेकरी : कोण र तूं कुठ निघालास ?

जिवा : (अगदी रूबाबात) मी बाबाजी पाटलाचा पोरगा ! शिवाजीला मारायला निघालोय !

पहारेकरी : (खदाखदा हसतात, खोटा आवाज काढून)- गडावर जायला महाराजांची परवानगी नाय.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

जिवा : (धीटपणे) मगा हंसता अन् आता का घाबरता! महाराजांची परवानगी नाय का? निस्ता मी आल्या आल्या घाबरला का महाराज तुमचा? पण मला महाराज नकोय, मला शिवाजी हवाय.

(पहारेकरी लुटुपुटूची झटापट करतात, निसटून जायला वाव देतात. मोठ्या पराक्रमाने चौकी ओलांडली अशा रूबाबात जिवा पुढं जाऊन पहारेकऱ्यांना खिजवतो. पहारेकरी पाठलाग करण्याचा आव आणतात तसा जिवा धूम ठोकतो. अशाच प्रकारे चौकीमागून चौकी असा पराक्रम करत जिवा पुढे जातो. दारावरच्या भालदारांनी भाले आडवे घातले.)

पहारेकरी1: (करडया आवाजात) कोण रं तूं? कुंठ निघालास?

जिवा : बाबा पाटलाचा पोरगा हाय मी! जिवा माझ नाव! तुमच्या शिवाजीपाशी माजं काम हाय.

पहारेकरी2 : महाराजांशी म्हण.

जिवा : आपल्याला महाराज बिराज न्हाई कळत. आईन मला शिवाजी हेच नाव सांगितलं. तुम्ही खोट बोलता. मला फसवता, पर मी फसायचा न्हाई. कुठय तो शिवाजी!

पहारेकरी : (खूप जोरात हसतात व भाला रोखून) महाराजांना मारायला येणाऱ्याला काय मिळतं ठाव हाये तुला?

जिवा : तुमी का आडवे येता उगी! मला शिवाजीला मारायचय, तुमचं आमचं काय भांडण नाय, अन् त्यो शिवाजी इतका घाबरतो वो कशापायी? मी येणार-कळलं का काय त्याला?

(भालदार मोठमोठ्याने हसतात. ती संधी साधून जिवा पट्कन आत प्रवेश करतो व धूम ठोकतो, गडावर हिंडत धूंडत जिवा महाराज होते तिथ येऊन पोहचतो. महाराज आत मोठ्या मंडळीशी बोलत बसलेले आहेत. गहन प्रश्नावर चर्चा चालली आहे. दारावरचे पहारेकरी जिवाला आडवतात. **दारावरची गडबड महाराजाना आत समजते.)**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

महाराज : (आतून आवाज येतो) कोण आहे रे पहाऱ्यावर? काय गडबड आहे.

पहारेकरी : येक पोरगा आलाय, महाराजांना भेटायच म्हणतूय!

महाराज : (आतून आवाज येतो) सोड बरं त्याला आत.

(महाराज व सर्व मंडळी कुतुहलानं बघत बसली आहेत. जिवा तलवार उपसून आत प्रवेश करतो. दोनचार माणसं बघून बुचकळ्यात पडतो. आईने शिवाजी नाव सांगितलय पण चेहरा मोहरा सांगितलेला नसतो. त्यामुळे जिवा सरळ प्रश्न करतो.)

जिवा : तुमच्यातला शिवाजी कोण हाय?

महाराज : का रे बाबा, कशाला पाहिजे शिवाजी तुला?

जिवा : ते काय करायचय तुम्हाला? मला त्याचा जीव घ्यायचाय? कुट हाय शिवाजी ? असेल खरा तर येईल पुढं.

महाराज : कारे बाबा? शिवाजीच्या जीवावर का उठलास?

जिवा : का म्हणजे? त्यानं माझ्या बाबाला मारलं म्हणून मी त्याला ठार मारणार हाये. मला येळ नाही. कोण असल त्यानं म्होर यावं. उघड उघड लढून आपून त्यांच मुंडक मारनार!

(जिवा पवित्र्यात उभा राहतो. सर्वजण कौतुकानं बघत आहेत. महाराज तलवार उपसून पुढे सरसावतात तसा तो त्याच्यावर त्वेषानं धावून जातो. महाराज हसत हसत त्याच्या तलवारीचे वार लिलया झेलत आहेत. जिवा चिडून प्रहार करीत आहे. महाराजानी एक गंमत केली. एकदा त्याची तलवार उडविली.)

जिवा : (वेडावून) आता का घाबरलास? माझी तलवार का उडवली! आमची तलवार उडवली म्हंजी घाबरलास तू.

महाराज : (हसून) तलवार परत देतात. ही घे तलवार!

जिवा अटीतटीन झुंजू लागतो. अखेर तो थकतो. शिवाजी हरत नाही हे पाहून शेवटी पराभव मान्य करतो.

NOT TO BE REPUBLISHED © KTRS

महाराज : (शिवाजी चेष्टा करतात) गिरफदार करा याला!
(दोघे शिपाई येतात व जिवाला जेरबंद करतात)

शिवाजीला मारण्याचा बेत करणाऱ्याला काय शिक्षा मिळते माहित आहे का?

जिवा : मी काय शिक्षेला डरतो की काय?

महाराज : असं? याला तोफेच्या तोंडी द्या?

जिवा : तोफेच्या तोंडी म्हंजी काय?

महाराज : म्हणजे तुला तोफेच्या तोंडापाशी उभं करून, तोफेला बत्ती द्यायची म्हणजे तोफेच्या गोळ्याबरोबर तूही आकाशात उंच उडशील आणि .....

जिवा : वा! छान आहे शिक्षा, उडवा मला आकाशात.

महाराज : पण तुझ्या चिंध्या चिंध्या होतील, ठाऊक आहे का? नको याचा कडेलोटच करा!

जिवा : म्हंजे काय?

महाराज : म्हणजे एका कड्यावरून तुला खाली ढकलून द्यायचं!

जिवा : नको नको, तुम्ही मला आभाळातच उडवा. पण महाराज येक सांगू का?

महाराज : काय?

जिवा : मी हिकडं येणार हे आईला सांगून न्हाई आलो. तिवढ सांगून येतो. मग काय करायचं खुशाल करा.

महाराज : हं, आता तुला आई आठवली काय? आईच नांव सांगून पळून जायचा बेत आहे काय?

जिवा : आईच्यान पळायचा न्हाई. देवाशपथ, अस्सा वाऱ्यासारखा दौडत जाऊन आईला सांगून येतो. सबूद दिला, बाबा पाटलाचा ल्योक हाये मी. दिस बुडायच्या आत न्हाई परत आलो तर काय करायच ते खुशाल करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

महाराज : आणि परत आला नाहीस तर तुझं काय करणार?

जिवा : (कळवळून म्हणतो) कंस सांगावं तुम्हाला ? येतो म्हंजी येतो पाहिजे तर तुमचा माणूस द्या एख्रादा माझ्या संग. मग तर झालं?
(महाराज, त्याचं म्हणण मान्य करतात. एका घोडेस्वाराला त्याला पोचवायला सांगतात व जाणाऱ्या इसमाच्या कानात काहीतरी सांगतात घोडेस्वार जिवाला घरी पोचवितो. आई दारापाशीच चिंतेत बसलेली आहे. तेवढयात जिवा प्रवेश करतो.)

जिवा : आई! ये आई!

आई : बाळा कुठं रे गेला होतास (डोळ्यातून आनंदाश्रू येतात)

जिवा : आई, सगळं सांगतो, आपल्या बाबाला मारणाऱ्या शिवाजी पत्तर पोचलो. त्येच्याबरोबर लढलो सुदिक. पन तेनं मला जित्त पकडलं हाय. शिवाजीनं मला तोफेच्या तोंडी देण्याचा हुकुम दिला हाय. आये, तुजा निरोप घ्याया आलो. मला तोफेच्या तोंडी द्यायच हाय, सूर्यास्ताच्या आत गडावर परत यायचा सबूद देऊन आलोय. म्हणून अखेरचा भेटाया आलोच. त्यो घोडेस्वार माजी वाट बघत असल भाईर! मला निरोप दे आये, येतो.
(ती माऊली मुसमुसून रडू लागते. समजूत काढण्याचा प्रयत्न करते.)

आई : तू माघारी जाऊच नगस. तुला मी लपविते. न्हाई तर आपून कुठं दुसरीकडं जाऊ या, येड्या. तू गेला तर मला कोण? कुणासाठी जगायच! त्ये तसे गेले-तू असा. जिवा, नग जाऊस ऐक माज!

जिवा : बाबा पाटलाचा पोर हाये मी! सबूद मोडायला माजी आय सांगते? न्हाई आये, मी जाणार. (आईच्या पायी डोकं ठेऊन जिवा तीरासारखा सुटतो. पण बाहेर घोडेस्वार बेपत्ता. शब्द पाळण्यासाठी जिवा गडाच्या दिशेने पळत सुटतो. वेळेवर पोचण्यासाठी धडपड, अखेर महाराजांपुढे उभा राहतो. धापा टाकतो. पाय लटपटत आहेत. उभे रहाणेसही त्राण नाही.)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

जिवा : सबूद पाळला. सूर्य बुडायच्या आत आलो!

(कसाबसा बोलत जिवा धाडकन जमिनीवर कोसळतो, बेशूद्ध होतो. जेव्हा शुद्धीवर येतो तेव्हा तो आईच्या मांडीवर डोके ठेऊन झोपलेला. आई त्याचे डोके चेपत आहे. डोळे उघडतो तेव्हा आई म्हणते.)

आई : ''बाळ जिवा बर वाटतं का रे आता?

जिवा : आये, मला तोफेच्या तोंडावरून उडविलं, त्यो मी हत येऊन पडलो का ग?

(आई, शिपाई, शिवाजी महाराज सारेच हसतात.)

(महाराजकडे दृष्टी वळवत) तू हत कसा? येका बारीला माझ्या हातून सुटलास, म्होरल्या वेळीबघ.


महाराज: (हसत हसत) मग पुढल्या वेळी असाच सापडलास तर कडेलोट.

जिवा : खुशाल। मी काय डरतो का काय? कसं आये ?

(हात जोडून विनवणी करते.) पोरगं आडाणी हाय, क्षमा असावी महाराज. जिवाच्या बाबांना तुम्ही मारल्याचं याला सांगितलं म्हणून हा सारा प्रकार घडला.

महाराज : (नम्रपणे) ''आई, क्षमा तर मी मागायला हवी.''

आपलं सौभाग्य माझ्या कडून हिरावलं गेलं. नाईलाजान मला हे कठोर कर्तव्य **करावं लागलं.**



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आई : भाकरीशी इमान राखण्यासाठी माझ्या धन्यानी आपल्याला विरोध केला.

महाराज : स्वराज्याची सेना गावातून जाऊ देणार नाही असे पाटील हट्टास पेटले. हेका सोडीनात, यामुळे मला कठोर व्हाव लागलं.

आई : महाराज झालेला अपराध पोटात घाला. अन् आज पासून जिवा आपला आहे. स्वराज्यासाठी मी जिवाला तुमच्या स्वाधीन करते.

महाराज : (गहिवरून) वेड्या जिवा, तुझ्यासारख्या नेक मराठयाचा जीव घेण्यासाठी शिवबाची धडपड नाही. अशी लाख मोलाची माणसं बळी देऊन, पापाची रास उभारायची नाही मला! देवा-धर्मांच स्वराज्य आम्हाला निर्माण करायच आहे. त्यासाठी तुझ्या सारखी नवरत्न मला जोडायची आहेत, तोडायची नाहीत. अशा वीर, धाडसी, निडर जिवाची स्वराज्याला आवश्यकता आहे. येतो आम्ही.

(जिवाच्या आईच्या पायावर डोके ठेऊन महाराज निघून जातात. हर हर महादेवच्या गर्जना, ... पडदा पडतो.)

नवीन शब्दार्थ :

अंतः करण	- मन	त्येचा	- त्याचा
त्राण	- दम	इसम	- माणूस, व्यक्ती
दौडत	- धावत	सबूद	- शब्द
भाईर	- बाहेर	तीर	- बाण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एक-दोन वाक्यात लिही.

1. जिवाची आई का रडत होती?
2. जिवाच्या वडिलाना कोणी मारलं?
3. शिवाजीचे वडिल कोणाच्या दरबारात जहागीरदार होते?
4. जिवाला गडावर जाताना कोण आडवतात?
5. जिवाला कोणती शिक्षा होईल असे महाराज बोलतात?

आ. खालील प्रश्नांची उत्तरे तीन-चार वाक्यात लिही.

1. जिवा शिवाजी महाराजाना मारण्यासाठी गडावर कसा पोहचला?
2. गडावर जाताना त्याला कोणत्या समस्याना तोंड द्यावे लागले?
3. जिवाला शिवाजी महाराजांना कशासाठी भेटायचं होतं?
4. भालदार मोठमोठयाने का हसू लागले?
5. भालदाराना फसवून जिवा दरबारापर्यंत कसा पोहचला?
6. जिवाला दरबारात कोणते दृष्य पहावयास मिळाले?
7. शिक्षा देण्याचे सांगताच जिवा कोणती प्रतिक्रीया व्यक्त करतो?
8. जिवाने महाराजाना काय वचन दिले?

इ. खालील वाक्ये कोणी-कोणास म्हटली ते लिही.

1. ''आये, माजा बाबा कुठं गेला ग? कंदी यायचा तो परत?''
2. ''तो काय एका जागी ऱ्हातोय''?
3. ''अरे पण कशासाठी भेटायचं तुला?
4. ''भाकरीशी इमान राखण्यासाठी माझ्या धन्यानी आपल्याला विरोध केला''.

ई. खाली काही बोली भाषेतील शब्द समाविष्ठ करावे. त्याचा अर्थ शिक्षकांच्या/पालकांच्या मदतीने प्रमाण भाषेत लिही.

उदा : आये - आई

कंदी -	नाय -	यडा -
कुनीबी -	म्हंजी -	म्होरं -
विस्कुट -	सबूद -	सुदिक -
सम्दी -	बारीला -	इमान -

टीप : याचप्रमाणे या पाठात आलेले बोली भाषेतील इतर शब्द शोधून लिही व त्यांचा प्रमाण भाषेतील अर्थ लिही.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

उ. खालील वाक् प्रचारांचा अर्थ समजून घे व लिही.

1. कपाळ पांढरं होणे. -
2. गळ्यात पडणे. -
3. धूम ठोकणे. -
4. जीवावर उठणे. -

ऊ. विरूद्धार्थी शब्द लिही.

स्वर्ग	×	प्रवेश	×
मारणे	×	शिक्षा	×
धीट	×	इमान	×
चटकन	×	विरोध	×

उपक्रम : हे नाटक शाळेच्या सांस्कृतीक कार्यक्रमात वर्गातील विद्यार्थ्यांच्याकडून सादर करा.

* हे असेच लिही.

धिक्कार, निर्भर्त्सना, खूश, एखादा



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

व्यंजन संधी :

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
विपद् + काल	द् + क् = त् + क् = त्क	विपत्काल
वाग् + पति	ग् + प् = क् + प् = क्प	वाक्पति
वाग् + ताडन	ग् + त् = क् + त् = क्त	वाक्ताडन
षड् + शास्त्र	ड् + श् = ट् + श् = ट्श	षट्शास्त्र
क्षुध् + पिपासा	ध् + प् = त् + प् = त्प	क्षुत्पिपासा

याबाबतचा नियम असा.

पहिल्या पाच वर्गापैकी अनुनासिका शिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो. याला **'प्रथम-व्यंजन-संधी'** म्हणतात.

* पुढील शब्दाचे संधी पाहा.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने वर्ण व संधी	जोडशब्द
वाक् + विहार	क् + व् = ग् + व् = ग्व	वाग्विहार
षट् + रिपू	ट् + र् = ड् + र् = ड्र	षड्रिपू
सत् + आचार	त् + आ = द् + आ = दा	सदाचार
अच् + आदी	च् + आ = ज् + आ = जा	अजादी
अप् + ज	प् +ज् = ब् + ज् = ब्ज	अब्ज

या बाबतचा नियम असा.

पहिल्या पाच वर्गातील कठोर व्यंजनापुढे अनुनासिकाखेरीज स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो. याला **'तृतीय - व्यंजन संधी'** म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. पुढील शब्दांचे संधी पाहा.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
वाक् + निश्चय	क् + न् =ङ् + न्	वाङ निश्चय
षट् + मास	ट् + म् = ण् + म्	षण्मास
जगत् + नाथ	त् + न् = न् + न्	जगन्नाथ
सत् + मती	त् + म् = न् + म्	सन्मती

याबाबतचा नियम असा.

पहिल्या पाच वर्गातील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो. याला **'अनुनासिक संधी'** म्हणतात.

4. पुढील शब्दातील संधी पाहा.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
सत् + चरित्र	त् + च् = च् + च्=च्च	सच्चरित्र
उत् + छेद	त् + छ् = च् + छ्=च्छ	उच्छेद
सत् + जन	त् + ज् = ज् + ज्=ज्ज	सज्जन
तत् + टीका	त् + ट् = ट् + ट्=ट्ट	तट्टीका
उत् + लंघन	त् + ल् = ल् + ल्=ल्ल	उल्लंघन
सत् + शिष्य	त् + श् = च् + छ्=च्छ	सच्छिष्य

या बाबतचा नियम असा : त् या व्यंजनापुढे -

1. च्, छ आल्यास त् बद्दल च् होतो.
2. ज्, झ् आल्यास त् बद्दल ज् होतो.
3. ट्, ठ् आल्यास त् बद्दल ट् होते.

© BKTBS NOT TO BE REPUBLISHED

4. ल् आल्यास त् बद्दल ल् होतो.

5. श् आल्यास त् बद्दल च् होतो. व पुढील श बद्दल छ होतो.

6. 'म' पुढे स्वर आल्यास तो स्वर - मागील 'म' मध्ये मिसळून जातो. व्यंजन आल्यास 'म' बद्दल मागील अक्षरावर अनुस्वार किंवा बिंदू येतो. जसे -

सम् + आचार = समाचार सम् + गती = संगती

7. छ् पूर्वी ऱ्हस्व स्वर आला तर त्या दोहोमध्ये च् हा वर्ण येतो जसे -

रत्न + छाया = रत्नच्छाया शब्द + छल = शब्दच्छल

अभ्यास

अ. पुढील शब्दाचे संधी करा व ते ज्या नियमानी होतात ते नियम सांग.

दिक् + विजय	दिक् + मूढ	जगत् + ईश्वर
सत् + मती	मत् + जनक	सत् + बुद्धी
आपद् + काल	उत् + लेख	षट् + मास

आ. पुढील शब्दातील संधी सोडवून पोटशब्द लिहा व त्याबाबतचा नियम सांग.


उद्धार	मृच्छकटिक	अब्धी
सच्चित	सच्छिल	भगवद्गीता
वाग्रस	उज्वल	दिगंबर
जगदीश्वर	सव्दासना	मन्मन

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

20. चोर रंगेहात पकडला गेला!

एकदा विजयनगरचा राजा कृष्णदेवराय यांचा दरबार भरला होता. नगरातील एका शेठजींनी आरडा - ओरडा करीत दरबारात प्रवेश केला, ''महाराज मी बरबाद झालो, माझी सर्व संपत्ती चोरीला गेली.'' राजा म्हणाला, ''माझ्या राज्यात चोरी!'' त्याने कोतवालाला आदेश दिला, ''चोरास लगेच पकडून आणा''.






कोतवालाला चोरास पकडणे जमले नाही. चोर चलाख होता। चोऱ्या होतच राहील्या। राजपुरोहितानी चोराला पकडण्याचे काम तेनालिरामाकडे सोपविण्याचे राजास सुचविले. तेनालीरामने शांतपणे राजास सांगितले ''मी चोराला लवकरात लवकर हजर करेन.''

@RTE NOT TO BE REPUBLISHED

तेनाली राम दरबारातून थेट जवाहिऱ्याकडे गेला. जवाहिऱ्यास हातास धरून त्याने एक योजना बनविली. जवाहिऱ्याने नगरात दवंडी पिटवून हिरे, माणकांचे प्रदर्शन भरणार असल्याची घोषणा केली. प्रदर्शन पाहण्यास चोरही आला होता. चोराने चोरी कशी करायची याची योजना तयार केली.




पहारेकऱ्याला सूचना देऊन जवाहीर घरी गेला. मध्यरात्री चोर घराच्या मागील बाजूस आला. आणि छतावर चढून घरात उतरला. चोराने तिजोरीचे बारकाईने निरिक्षण करून तिजोरी उघडली. जडजवाहीर पिशवीत भरून तो छतावरून उतरू लागला.




NOT TO BE REPUBLISHED

साध्या वेशातील शिपायांची त्याच्यावर नजर पडली. तो ओरडू लागला. इतर लोकही मशाली घेऊन जमू लागले. पण गडबडीचा फायदा घेऊन चोर जवाहिराची पिशवी टाकून पळून गेला.




लोक चोराला शोधू लागले. चोरही गर्दीत सामील झाला. इतक्यात शिपाई ओरडला, ''कोणीही जागेवरून हलू नका, चोर गर्दीतच आहे.'' चोराला हसू आले. कारण त्याच्याजवळ चोरीचा माल नव्हताच! इतक्यात एका शिपायाची नजर चोरीच्या पिशवीवर पडली.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिपायाने पिशवी उघडून पाहिली त्यात जडजवाहिर होते. जवाहिऱ्याला आनंद झाला. पण चोराला कसे पकडायचे असा प्रश्न शिपायापुढे उभा राहिला. ते पाहून गर्दीतून तेनालीराम पुढे आला. व तो म्हणाला, ''ज्याचे हात व कपडे लाल रंगाने माखले असतील त्याला तुम्ही पकडा. तोच चोर आहे.'' चोराला रंगेहात पकडण्यात आले.





दुसरे दिवशी चोराला दरबारात हजर करण्यात आले. राजाने तेनालीरामला विचारले, ''तू काय युक्ती केलीस बरे!'' तेनालीरामने राजाला सांगितले की, ''मी प्रदर्शनानंतर तिजोरीमध्ये भरपूर रंग शिंपडून ठेवला होता. त्यामुळे चोराचे हात लाल रंगाने रंगले व तो सापडला.'' याच घटनेनंतर - 'रंगेहात पकडले जाणे' हा वाक्प्रचार प्रचलित झाला.

- योगेश जोगी

© BSTBS NOT TO BE REPUBLISHED

* **उपक्रम** -1. अशा प्रकारच्या चित्रकथा मिळवून वाच.
  2. सदर चित्रकथा संवादरूपाने सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

* **हे असेच लिही -**

हुजूर, हूकूम, गंमत, विसकळीत.



21. आणि काय आश्चर्य!

P5M6S4

समजा, एका काळोख्या रात्री घनदाट जंगलातून तुम्ही एकटेच चाललाय. आणि एकदम वाघ समोर येऊन उभा ठाकला, तर तुम्ही काय कराल? तुमची घाबरगुंडी उडेल. अहो, घाबरगुंडी कसली अगदी बोबडीच वळेल बरं! आणि वाघाला ऐतीच शिकार मिळेल ती वेगळीच!

कोकणातल्या म्हणजे भारतातील कॅलिफोर्नियातील नानूवर असाच एक प्रसंग बेतला. त्याच्या घराच्या आसपास घनदाट जंगल होतं. अधुनमधुन एखादी वाडी. तेवढीच काय ती माणसांची जाग. पावसात तर काय? सगळीकडे पाणीच पाणी. नानू तर म्हणायचा, ''तिकडे आसामात चहाचे मळे आणि कोकणात चहाचे तळे!''.


नानूला भटकायची भारी आवड होती. केव्हाही कुठेही जायला ह्याची नेहमीच तयारी. त्याची आई तर म्हणायची, ''आमच्या नान्याच्या पायावर नक्षत्र पडलेलं आहे.''नानू फक्त दिवसाच फिरायचा अस नाही तर तो रात्री अपरात्रीही फिरायचा. त्याच्या शब्दकोशात भीती हा शब्दच नव्हता. भटकताना मात्र त्याला हातात काठी-बॅटरी आणि पायात करकरीत वहाणा लागायच्या. त्याच्या तालावर हा सगळीकडे मजेत फिरायचा.

एकदा काय झाल, गावाशेजारच्या वाडीत शंकराच्या देवळात शिवरात्रीचा उत्सव होता. रात्री 12 वाजता शंकराची अर्चना होती. गावकरी संध्याकाळीच देवळात जमले होते. देवळाकडे जाणारा रस्ता जंगलातून जात असल्याने सर्वांनी काळजी घेतली होती. नानू घरीच होता. त्याने गाईच्या धारा काढल्या, गुंराना चारा घातला, नानूने देवासमोर दिवा लावला, घराला कुलूप घातले. सगळे होईपर्यंत बरीच रात्र झाली. डोळयात बोट घातले तरी दिसू नये इतका दाट अंधार पडला होता. नानूने देवळाची वाट धरली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

रातकिड्यांची किर्र ऽऽ किर्र ऽऽ, साथीला बेडकांचे तंबोरे, सरडे, साप यांची सरसर, झुडुपात होणारी खसफस, टिटवीची टिवटिव. या सर्व आवाजात आपल्या वहाणेच्या कर्र ऽऽ कर्र ऽऽ येणाऱ्या आवाजाबरोबर नानू रमत गमत चालला होता. घोडाच्या धुत्काराला नानू तसाच आवाज काढून प्रत्युत्तर देत होता. कांडेचोर या प्राण्याचा किंचाळी मारल्याचा आवाज तर अगदी माणसासारखाच वाटतो. मोठे भितीदायक वातावरण होते. पण ह्या सगळ्याला घाबरेल तर तो नानू कसला? तो पुढे पुढे जातच होता.

थोडी वाट संपली. बॅटरीचा प्रकाश पायवाट उजळून टाकीत होता. एवढयात इतके दिवस वर्णन ऐकलेला भला मोठा वाघोबा नानू समोर अचानक उभा राहीला.



अंगावर पिवळे पट्टे, चमकणारे भयंकर डोळे, धारदार सुळे, कडक मिशा, प्रकाशाच्या झोतात अख्खा वाघ नानूला दिसत होता. डोळ्यावरच प्रकाश पडल्याने वाघाला मात्र नानू दिसत नव्हता. तरी त्याला नानूचा वास लागला होता. दोघेही एकमेकासमोर उभे ठाकलेले होते. नानूने न डगमगता विचार करण्यास सुरुवात केली. वाघ स्थिर नजरेने त्याच्याकडे पहात होता. त्याच्या डोळयाची पापणीही लवत नव्हती. नानूला वाटले हाच आपल्याला घाबरलाय की काय? त्याच्या डोक्यात

लखख प्रकाश पडला. त्याला मामाचे शब्द आठवले, ''रानातल्या जनावरांचे डोळे बॅटरीच्या प्रकाशाने दिपून जातात व त्यांना पुढचे काहीच दिसत नाही.'' तरीच बंगालमधील सुंदर बनातील लोक डोक्याच्या मागील बाजूस तोंडाचा मुखवटा घालून जातात वाटते. नानूचे विचार चक्र जोराने फिरू लागले.

पण असे कितीवेळ चालायचे? त्याने विचार केला, बॅटरी अशीच चालू ठेवायची आणि आपण मागच्या मागे पळ काढायचा. पण तेवढया हालचालीने वाघाने उडी घेतली तर! आपली हाडे सुध्दा शिल्लक राहायची नाहीत. नको रे बाबा, एक म्हणता बेक व्हायचे. आता मात्र नानू थोडासा घाबरला. त्याने महादेवाचा धावा सुरू केला. त्याच्या मनात आले, झाडावर चढावे की काय? पण वाघालाही झाडावर चढता येते हे त्याच्या लक्षात आले. हातातल्या काठीने वाघाला एक फटका चढवावा असा धाडसी विचार त्याच्या मनात आला. पण मग त्या फटक्याची किंमत म्हणून आपल्याला या जगाचा कायमचा निरोप घ्यावा लागेल असे त्याला वाटले.

नानूच्या डोक्यात एक जबरदस्त कल्पना आली. हा वाघ म्हटल तरी खाणारच आणि वाघ्या म्हटल तरी खाणारच! का बरं आपणच याला घाबरवू नये. प्रत्येक प्राण्याला दुसऱ्या प्राण्याची भीती असतेच की! अगदी हत्तीला मुंगीची भीती असते. आता मात्र नानूने ताबडतोब कृती केली. हातातली बॅटरी क्षणभरच बंद केली. त्याने सर्व शक्ती पणाला लावून भयंकर किंकाळी फोडली, हातातली काठी उगारून पाऊल दाणकन पुढे टाकले. जसे काही तो वाघाला झोडपून काढणार होता. त्याने बॅटरीचा प्रकाश पुन्हा वाघाच्या डोळ्यावर सोडला.

आणि काय आश्चर्य! वाघ मागे परतला. निमूटपणे आलेल्या वाटेने चालू लागला. त्याने एकदाही मागे वळून पाहिले नाही. नानूची उरली सुरली भीती पळून गेली. वाघ बाजूच्या दाट अरण्यात निघून गेला. वाघाच्या डोळ्यावर बॅटरीचा प्रकाश टाकण्याचे

NOT TO BE REPUBLISHED @KTDS

प्रसंगावधान राखल्यामुळे नानूचे प्राण तरी वाचलेच आणि जंगलातलानवीन अनुभवही मिळाला. काहीच घडले नाही अशा रितीने नानू महादेवाच्या उत्सवाला निघाला.

- पुरुषोत्तम धाकस

नवीन शब्दार्थ :

ऐती -काहीही कष्ट न करता मिळालेली.

न डगमगता - न घाबरता, अर्चना - पूजा

वाडी - दहा वीस घरांची छोटी वस्ती (वसती)

वाक्प्रचारांचा अर्थ लिही

पायावर नक्षत्र पडणे - सारखे फिरत राहणे

1. उभे ठाकणे.
2. घाबरगुंडी उडणे.
3. प्रसंग बेतणे.
4. डोळ्यात बोट घातले तरी न दिसणे.
5. वाट धरणे.
6. रमत गमत जाणे.
7. पाठ दाखविणे.
8. धावा करणे.
9. जगाचा निरोप घेणे.
10. शक्ती पणाला लावणे.
11. झोडपून काढणे.
12. एक म्हणता बेक होणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. नानूला कशाची आवड होती?
2. नानूची आई काय म्हणायची?
3. शंकराचे देऊळ कोठे होते?

4. देवळात कसला उत्सव होता?

5. नानू कोणाला प्रत्युत्तर देत असे?

6. नानूने कोणाचा धावा सुरू केला?

आ. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. नानूच्या घराचा आसपासचा परिसर कसा होता?

2. गावकरी देवळात संध्याकाळी का जमले होते?

3. देवळात जाण्यापूर्वी नानूने काय काय केले?

4. नानूच्या मनात कोणता धाडसी विचार आला?

इ. सविस्तर उत्तरे लिही.

1. रात्रीच्या जंगलाचे वर्णन कर.

2. बॅटरीच्या झोतात नानूने पाहिलेल्या वाघाचे वर्णन कर.

3. नानूला मामाचे कोणते शब्द आठवले?

4. नानूने वाघाला कसे पळवून लावले?

ई. खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते सांग.

1. ''नान्या जंगलात फिरतोस वाघ समोर उभा राहिला तर त्याला पाठ मात्र कधीच दाखवू नकोस हं!''

उ. असे का म्हटले आहे?

1. ''आमच्या नान्याच्या पायावर नक्षत्र पडलेलं आहे.''

2. ''तिकडे आसामात चहाचे मळे आणि कोकणात चहाचे तळे.''

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऊ. जोड्या जुळव

अ	ब
1. रातकिडे	1. तंबोरे
2. बेडूक	2. किर्र ऽऽ किर्र ऽऽ
3. सरडे, साप	3. धुत्कार
4. घुबड	4. माणसासारखी किंकाळी
5. टिटवी	5. सरसर
6. कांडेचोर	6. टिवटिव

ए. सुट्टीच्या दिवशी क्रीडांगणावर खेळत असताना तुझ्या मित्राला अचानक चक्कर आली तर तू कोणते प्रसंगावधान दाखवशील?

* शिक्षकांच्या सहाय्याने कर्नाटकातील अभयारण्यांची माहिती लिही.
* निरनिराळ्या प्राणी-पक्ष्यांची रंगीत चित्रे जमव व वहीत चिकटव.
* हे असेच लिही.

सुसकारा, हिंस्र, हिंमत, अनसूया, निःश्वास, चतुष्पाद.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

विराम चिन्हे

आपण जेव्हा बोलत असतो तेव्हा अधूनमधून थांबावेच लागते. या थांबण्याला **'विराम'** असे म्हणतात. आपण जी वाक्ये उच्चारतो ती सारीच काही सारखी नसतात. केव्हा केव्हा आपले विधान पूर्ण झालेले असते, केव्हा ते अपूर्ण राहिलेले असते. केव्हा उद्‌गार काढावयाचा असतो. अशावेळी तो आशय व्यक्त करण्यासाठी तो कमी अधिक वेळ थांबतो. किंवा आवाजाच्या चढउतारावरून आपला आशय व्यक्त करतो.

पण ज्यावेळी आपला विचार लिहून दाखविला जातो. त्यावेळी हा वेळोवेळी घ्यावा लागणारा विराम निरनिराळ्या चिन्हानी दाखवावा लागतो. त्यानाच **'विरामचिन्हे'** असे म्हणतो. योग्य विरामचिन्हांचा वापर कोठे व केव्हा करावा याची कल्पना आपणास आवश्य हवी. आपल्या लेखनात वारंवार येणारी विरामचिन्हे कोणती व केव्हा वापरतात हे थोडक्यात पुढील तक्त्यात दिली आहेत.

क्र.	चिन्हाचे नाव	चिन्ह	केव्हा वापतात?	उदाहरण
1.	पूर्ण विराम	.	1. विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी. 2. शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरापुढे.	1. तो घरी गेला. 2. ता.क. (ताजा कलम) य.गो. = (यशवंतगोपाळ)
2.	अर्धविराम	;	दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असता.	ढग खूप गर्जत होते; पण पाऊस पडला नाही.
3.	स्वल्पविराम	,	1. एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास. 2. संबोधन दर्शविताना	1. हुशार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात. 2. मधू, इकडे ये.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4.	अपूर्ण विराम (उपपूर्णविराम)	:	वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास	पुढील क्रमांकाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले : 1,8,14, 27,40.
5.	प्रश्नचिन्ह	?	प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी.	तू केव्हा आलास ?
6.	उद्‌गारचिन्ह	!	उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी	1. अरेरे ! तो नापास झाला. 2. शाबास ! छान खेळलास.
7.	अवतरण चिन्हे	‘‘ ’’	(दुहेरी) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्याकरिता. (एकेरी) एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता. दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगताना.	तो म्हणाला, ‘‘मी येईन.’’ मूलध्वनींना ‘वर्ण’ असे म्हणतात.
8.	संयोगचिन्ह	-	1. दोन शब्द जोडताना. 2. ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.	विद्यार्थी-भांडार, प्रेम-विवाह. आजचा कार्यक्रम शाळे- पुढील पटांगणावर होईल.
9.	अपसरण चिन्ह (डॅश) (स्पष्टीकरण (चिन्ह)	-	1. बोलता बोलता विचारमालिका तुटल्यास. 2. स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास.	1. मी तेथे गेलो, पण- 2. तो मुलगा - ज्याने बक्षीस मिळविले - आपल्या शाळेत आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

22. अभंग





पंढरीचा वास चंद्रभागे स्नान
आणिक दर्शन विठोबाचे ।।1।।

हेचि मज घडो जन्मजन्मांतरी
मागणे श्रीहरी नाही दुजे ।।2।।

मुखी सदा नाम, संताचे दर्शन
जनी जनार्दन ऐसा भाव ।।3।।

नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारी
कीर्तन गजरी सप्रेमाचे ।।4।।

-संत नामदेव-

(मुल्य-स्वामीनिष्ठा, साधेजीवन, व्यसन विरोध)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

1. वास - वसती करणे, राहणे
2. स्नान - अंघोळ
3. मज - मला
4. दुजे - दुसरे
5. मुखी - तोंडात
6. ऐसा - असा

अभ्यास

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. नामदेव महाराजाना कोठे रहावे असे वाटते ?
2. कशाचे स्नान व्हावे असे नामदेव म्हणतात ?
3. मुखाने कोणाची स्तुती करावी असे नामदेवाना वाटते ?
4. पांडुरंगाकडे नामदेव कोणते मागणे मागतात ?
5. नित्य नेमाने काय घडावे असे नामदेव म्हणतात ?

आ. प्रस्तुत अभंगाचा भावार्थ शिक्षकांच्या मदतीने लिही.

* हे असेच लिही.

हृषीकेश, ज्येष्ठ, पीतांबर, प्रकट

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. खाली दिलेल्या शब्द सागरात संतांची नांवे दडली आहेत, ती शोध लिही.

मी	ब	स	वे	श्व	र	चो	चो	ध	ख
श	रा	ज्ञां	ह	क	बी	र	खा	र	भ
ड	ल	बा	ने	झ	म	ळ	ट	मे	न
रा	मु	क्ता	ई	श्व	तु	का	रा	म	का
म	गो	रा	कुं	भा	र	स	का	क	ए
दा	फ	भा	क्ष	सो	पा	न	दे	व	क
स	न	ए	थ	ना	ती	वृ	नि	ज्ञ	ना
ळ	तु	क	डो	जी	म	हा	रा	ज	थ
क	न	क्र	दा	स	आ	दे	ज	घ	त
छ	गा	ड	गे	बा	बा	ज	व	ख	ल

1. ज्ञानेश्वर
2. _____
3. _____
4. _____
5. _____
6. _____
7. _____
8. _____
9. _____
10. _____
11. _____
12. _____
13. _____
14. _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. शिक्षकांच्या मदतीने जोड्या जुळव.

अ		ब
1.	ज्ञानेश्वर	गाथा
2.	तुकाराम	रामायण
3.	व्यास	ज्ञानेश्वरी
4.	वाल्मीकी	एकनाथी भागवत
5.	एकनाथ	महाभारत

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

शब्द संग्रह

अ

अनन्य

अन्नधान्य

अव्वल

अजिंक्य

अभिमान

अभियान

अविरत

अनुमती

अवलंबुन

अभेद्य

अवलोकन

अवघड

अवखळ

अशक्य

अपराध

अवकाश

अर्चना

अभिनंदन

अडाणी

अनुरूप

अश्रुजळ

अटोकाट

आ

आकर्षण

आश्रम

आचरण

आश्चर्य

आदर्श

आघात

आधारस्तंभ

आज्ञापालन

आराधना

आर्थिक

आत्मविश्वास

आर्कुली

आहुती

आंदोलन

आगर

आदेश

इ

इंधन

इलेक्ट्रॉन

इमान

इंजिनीअरींग

ई

ईश्वर

उ

उगम

उन्नत

उजाड

उर्जा

उष्णता

उमद्या

उद्यान

उद्योग

उत्सव

उपखंड

उपमा

उधळणे

उपसळ

ऋ

ऋण

ऋषीमुनी

ए

एकता

एकत्र

एकाग्रता

एरॉनॉटिक्स

ऐ

ऐच्छिक

ओ

ओणवी

ओघळणे

ओवाळणे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अं

अंगरक्षक

अंगकाठी

अंतरंगी

अंधारून

अंतर्धान

अंतराळवीर

क

कला

कलिका

करारी

कडकडाट

करियर

कामना

काळ्याभोर

क्रांती

किलबिल

कुशी

कुष्ठरोग

कुळकुळीत

कुटीरोद्योग

कृपाशीर्वाद

कृमी

कृत्रीम

कैद

कोसळणे

कौलारू

कक्ष

कपाळ

कठोर

कर्तव्य

कव्वाली

कसोटी

कर्तृत्वशाली

कडेलोट

काटछाट

कांडेचोर

किंमत

कुंद

कुसुम

कुतुहल

कृती

ख

खराटा

खजिना

खजील

खाचीले

खंड

खदाखदा

खसफस

खाण

ख्याती

खिजवणे

खुशाल

खेद

ग

ग्राम

गुणधर्म

गुप्तहेर

गैरसमजुत

गोजीरवाणी

गंध

गजल

गड

गडबड

गर्जना

ग्रह

गहन

गहीवरणे

गिरफदार

गुंतागुंत

घ

घटना

घडसुनी

घडामोडी

घनदाट

घाव

घाबरगुंडी

धूत्कार

घोषणा

घोडेस्वार

च

चर

चपळता

चराचर

चर्चा

चपला

चमकणे

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

चतुर
चतुरंग
चाल
चाहूल
चिकाटी
चिरस्मरणीय
चेव
चंचला
चमक
चलाख
चाचणी
चिडीचुप
चिरा
चिरणे
चिंध्या
चिमुकली
चौकी

छ

छान
छंद
छत
छळ

ज

जलधारा
जडशीळ
जलबिंदू
जबाबदारी
जागृत
जिद्द
जन
जननी
जन्म
जलसिंचन
जवाहिर
जनार्दन
जेरबंद

झ

झळाळून
झेलणे
झड
झडप
झाप
झालर
झावळ्या
झुंजणे
झेपावणे

ट

टपोऱ्या
टिवटिव

ठ

ठसा
ठाण

ड

डसणे
डगमगणे
डोंगर
डरणे

ढ

ढकलणे

त

तट
तजेला
तज्ज्ञ
तंत्रज्ञान
तरबेज
तडाखा
तरतरीत
तपोवन
तांडव
ताशा
त्याग
तिरपी
तेजोलता
तंदुरूस्ती
तोफगोळ
तडजोड
तळमळणे
त्राण
तारे
तिजोरी
तीर
त्वेष
तेजस्वी
तंबोरे

थ

थरथरणे
थैमान

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

द
दत्तक
दर्या
दरी
दडणे
दर्शन
दासी
दुजा
दुरी
दु:ख
दुमदुमणे
दुर्गूण
दूरदृष्टी
दौलत
दृष्टी
दांडपट्टा
दरबार
दवंडी
दुजे
देदीप्यमान
दौडत
दंग

दांपत्य
ध
धन
धडपड
धाडस
ध्वनी
ध्यान
ध्येय
धैर्य
धनी
धारदार
धुंडत
धूम
धांगडाधिंगा
न
नम्र
नागमोडी
निगा
निश्चय
निर्णय
निर्मल
निराधार

निरखणे
निवांत
निसर्ग
नृत्य
नैपुण्य
नंदनवन
नयन
नवरत्न
नक्षत्र
नाद
निडर
नित्य
निर्धार
निरीक्षण
निशिगंध
प
पट
पट्टी
पठण
परमार्थ
परिश्रम
परोपकार

पशुपालन
पर्याय
पराकाष्टा
प्रकाश
प्रवाह
प्रतिष्ठा
प्रशिक्षण
प्रतीपक्षी
प्रचंड
प्रबोधन
प्रवृत्त
प्रफुल्लीत
पाती
प्यादी
पाटी
पारंगत
प्रार्थना
प्राचीन
पुरस्कार
पुसणे
पोक्त
पौराणिक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पौरुष
पराक्रम
परंपरा
पराभव
पहारेकरी
परवानगी
प्रणाम
प्रचलीत
प्रहार
प्रदक्षिणा
पापणी
पायपेटी
पिपाणी
पांघरणे

फ

फाशी
फितुरी
फीत
फलक

ब

बचाव
बळी
बहरणे
बाणा
बुद्धीबळ
बौद्धिक
बरबाद
बत्ती
बुचकळ्यात
बेट
बेशुद्ध
बोध

भ

भेद
भरजरी
भटकणे
भगिनी
भार
भावजय
भाता
भालदार
भीती
भृंग
भांडण

म

मर्यादा
मणी
मागास
मार्गदर्शन
मैदानी
मोहरा
मोती
मंदिर
मांड
मांडणी
मज
मशाल
महाल
महापराक्रमी
मढणे
मदनबाण
मनधरणी
माखणे
महाद्वार
माय
माहेर
मित्र
मुसमुसून
मैफिल
मोह
मोतीया
म्होरं
मंद

य

युक्ती
योद्धा
यंत्र
यादी

र

रक्षण
राष्ट्रसंत
रूचणे
रूढ
रेखाटणे
रोगराई
रममाण
रूबाब
रूजविणे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ल

लक्ष

लखलखाट

लखलखीत

लवलवणे

लालभडक

लाही

लुटू पुटू

लुप्त

लख्ख

लबाड

लढाई

लळा

लेण

लतिका

लक्षणीय्

लिलया

लोकप्रिय

व

वहन

वळचण

वयस्कर

वजीर

वळी

वाफ

वाळवंट

व्यायाम

वाटोळे

वातावरण

विसर्जन

विश्वास

विद्युतभार

वीज

वीर

वहाणा

व्यसनमुक्ती

वास

वाडी

वारी

वाटिका

वारेमाप

विनवणी

विभाग

विसंबणे

विद्यापीठ

विस्फारणे

श

शरण

श्रद्धा

शिस्त

शिष्य

शिदोरी

शीड

शूर

श्रेष्ठ

शोध

श्लोक

शब्दकोश

शास्त्रीय

शिपाई

शिरणे

शेला

शेंडेफळ

शिंपडणे

स

सहकार्य

सवंगडी

सतरंज

स्वच्छता

सहनशिलता

स्वयंपूर्ण

साधन

स्वार्थ

सान्निध्य

सानुली

सारवणे

स्वावलंबन

स्वातंत्र्य

सारीपाट

सुवाहक

सुदृढ

स्फूर्ती

स्तूती

सूड

सेना

सेनापती

सौर

संघटना

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संस्थान	सपकारे	संगणकीय	हृदय
संरक्षण	स्वर्ग	संपत्ती	हट्टी
संचार	स्वराज्य	संधी	हर्ष
संदेश	साय	संवादिनी	हाहाकार
संस्कृत	सार्थ	संशोधक	हिरा
सांघिक	स्नान	संशोधन	हिरावणे
संवेदना	स्वाधीन	सांगाडा	हेका
सडा	स्थिर	**ह**	**क्ष**
सदन	सुर्यास्त	हक्क	क्षमता
स्वप्न	स्फोट	हल्ला	क्षेत्र
सरकार	सौभाग्य	हालचाल	क्षणभर
सदाचार	संपर्क	हिंदुस्तान	क्षमा
समाविष्ट	संस्कार	हुकुम	**ज्ञ**
स्वरवाद्य	संवाद	हलका	ज्ञान

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED